Visit Dwarkadheeshvastu.com For

FREE Vastu Consultancy, Music, Epics, Devotional Videos
Educational Books, Educational Videos, Wallpapers

****

All Music is also available in CD format. CD Cover can also be print with your Firm Name

****

We also provide this whole Music and Data in PENDRIVE and EXTERNAL HARD DISK.

Contact : Ankit Mishra ( +91-8010381364, dwarkadheeshvastu@gmail.com )

****

# SARTH MANACHE SHLOK

(Oriya)

****

ईश्वराच्या प्राप्तीची इच्छा धरावी. विषयांमध्ये सुख असते, अशी चुकीची कल्पना करून घेऊ नकोस. विषय-विकारांत बुडल्यास जगात छीथू होते.(५)

६

**नको रे मना क्रोध हा खेदकारी । नको रे मना काम नानाविकारी ।**
**नको रे मना सर्वदा अंगिकारू । नको रे मना मत्सरू दंभभारू ॥**

हे मना, क्रोध हा शेवटी दु:ख देणारा आहे. म्हणून त्यापासून दूर राहा. कामवासना ही अनेक प्रकाराचे दोष उत्पन्न करणारी आहे. म्हणून तिच्या अधीन होऊ नकोस. तसेच कुणाचा मत्सर करू नकोस आणि कधी ढोंग करू नकोस.(६)

७

**मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें । मना बोलणे नीच सोशीत जावें ।**
**स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावें । मना सर्व लोकांसि रे नीववावें ॥**

हे मना, नेहमी मोठे धैर्य धारण करावे.कोणी अपशब्द बोलले तर ते शांतपणे सोसावेत. स्वत: नेहमी नम्रतेने बोलावे. आणि आपल्या बोलण्याने सर्वांना समाधान द्यावे.(७)

८

**देहे त्यागितां कीर्ति मागें उरावी । मना सज्जना हेचि क्रीया धरावी ।**
**मना चंदनाचे परी त्वां झिजावें । परी अंतरी सज्जना नीववावें ॥**

हे मना, जीवनामध्ये अशी कामे करावीत की मृत्यूनंतरही मागे कीर्ती उरावी. लोकांच्यासाठी स्वत:चा देह चंदनाप्रमाणे झिजवावा, आणि सज्जन लोकांना समाधान द्यावे.(८)

९

**नको रे मना द्रव्य ते पूढिलांचे । अति स्वार्थबुद्धीने रे पाप सांचे ।**
**घडे भोगणें पाप ते कर्म खोटें । न होतां मनासारिखे दु:ख मोठें ॥**

हे मना, दुसऱ्याच्या धनाची अभिलाषा बाळगू नये. अशा अत्यंत स्वार्थबुद्धीमुळे पापाचा संचय होऊ लागतो. आणि त्याचे फळ भोगावे लागते. पापे करूनसुद्धा मनासारखे झाले नाही, तर पदरी दु:खच येते.(९)

१०

**सदा सर्वदा प्रीति रामीं धरावीं । दु:खाची स्वयें सांडी जीवीं करावी ।**
**देहेदु:ख तें सूख मानीत जावें । विवेकें सदा स्वस्वरूपी भरावें ॥**

हे मना, नेहमी भगवंताचे प्रेम बाळगावे. दु:खाची जाणीव ठेवू नये. देहाला जें कष्ट होतात त्यात सुखच मानावे. नेहमी विवेक बाळगून आत्मस्वरूपामध्ये मग्न

राहावे.(१०)

११

**जनीं सर्वसूखी असा कोण आहे ? विचारें मना तूंचि शोधूनि पाहे ।**
**मना त्वां चि रे पूर्वसंचित केलें । तयासारिखें भोगणें प्राप्त झालें ॥**

हे मना, या जगात सर्व तऱ्हेने सुखी असा कोण आहे, ते तूच विचार करून शोधून काढ. अरे, जगात सर्व तऱ्हेने सुखी कोणीही नाही. पूर्व जन्मी जे कर्म संचित झालेले आहे, त्या प्रमाणे तुला या जन्मी भोगावे लागते.(११)

१२

**मना मानसीं दु:ख आणूं नको रे । मना सर्वथा शोक चिंता नको रे ।**
**विवेकें देहबुद्धि सोडून द्यावी । विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी ॥**

हे मना, दु:खाचा विचार करीत बसू नकोस. दु:ख आणि काळजी करू नकोस. त्यामुळे जीवन कुंठित होऊन जाते. विवेक धरून देहबुद्धी सोडून द्यावी. देह हा नाशवंत आहे. त्याच्या सुखाची काळजी किती करायची? तेव्हा देहबुद्धी सोडून विदेह बनावे आणि मुक्तीचा आनंद घ्यावा.

१३

**मना सांग पां रावणां काय झालें । अकस्मात तें राज्य सर्वें बुडालें ।**
**म्हणोनी कुडी वासना सांडि वेगी । बळें लागला काळ हा पाठिलागी ॥**

हे मना, रावणाचे शेवटी काय झाले ? पाप-वासनेमुळे त्याचे सर्व साम्राज्य नष्ट झाले. म्हणून दुष्ट वासना लगेच टाकून दे. कारण काळ हा पाठलाग करीत आहे.(१३)

१४

**जिवां कर्मयोगें जनी जन्म झाला । परी शेवटीं काळमूखीं निमाला ।**
**महा थोर ते मृत्यूपंथेचि गेले । कितीयेक ते जन्मले आणि मेले ॥**

पूर्वजन्मीच्या कर्माप्रमाणे मनुष्यास जन्म मिळतो. परंतु शेवटी तो मृत्यूच्या मुखात जातो. जगात मोठमोठे पुरुष होऊन गेले, पण ते सर्व मृत्यूच्या मार्गानेच गेले. आजपर्यंत अगणित लोक जन्मले आणि मरून गेले. कोणीही वाचला नाही.(१४)

१५

**मना पाहतां सत्य हे मृत्यूभूमी । जिता बोलती सर्वही जीव मी मी ।**
**चिरंजीव हे सर्वही मानिताती । अकस्मात सांडूनिया सर्व जाती ॥**

हे मना, खरे तर हे जग म्हणजे मृत्युलोक होय. तरीही लोकांना मृत्यूची आठवण येत नाही आणि सर्वजण 'मी, मी' करीत जातात. आपण चिरंजीव

आहोत असे सर्वजण समजतात, पण मृत्यूची झडप पडताच सर्व टाकून त्यांना अकस्मात निघून जावे लागते.(१५)

१६

**मरे येक त्याचा दुजा शोक वाहे । अकस्मात तोही पुढें जात आहे ।**
**पुरेना जनीं लोभ रे क्षोभ त्यातें । म्हणोनी जनीं मागुता जन्म घेतें ॥**

एक मनुष्य मरतो, तेव्हा दुसरा त्याच्यासाठी शोक करीत बसतो. पण तो दुसरा मनुष्यही मृत्यूकडे वाटचाल करीत असतो. जगात माणसाचा लोभ कधी पुरा होत नाही; म्हणून मन बेचैन असते आणि वासना उरल्यामुळे पुन्हा जन्म-मरणाचे दु:ख भोगावे लागते.(१६)

१७

**मनीं मानव व्यर्थ चिंता वाहातें । अकस्मात होणार होऊनि जातें ।**
**घडे भोगणे सर्वही कर्मयोगें । मतीमंद तें खेद मानी वियोगें ॥**

मनुष्य हा विनाकारण काळजी करीत असतो. जे व्हायचे ते अचानक होऊन जाते. जीवनात ज्या घटना घडतात व जे काही भोगावे लागते ते पूर्वकर्मामुळे होय, अज्ञानी मनुष्य मात्र काही दुरावल्यास दु:ख मानतो.(१७)

१८

**मना राघवेवीण आशा नको रे । मना मानवाची नको कीर्ति तूं रे ।**
**जया वर्णिती वेद शास्त्रे पुराणें । तया वर्णितां सर्वही श्लाघ्यवाणे ॥**

हे मना, एका रामावाचून तू कशाचीही आशा धरू नकोस. स्वार्थासाठी कुणाही मनुष्याची स्तुती करू नकोस. वेद, शास्त्रे व पुराणे ज्या ईश्वराची स्तुती करतात, त्याची स्तुती करणे हेच योग्य होय.(१८)

१९

**मना सर्वथा सत्य सोडूं नको रे । मना सर्वथा मिथ्य मांडू नको रे ।**
**मना सत्य तें सत्य वाचे वदावें । मना मिथ्य तें मिथ्य सोडूनि द्यावें ॥**

हे मना, सत्य कधीही सोडू नकोस. आणि जे असत्य आहे त्याचा आधार घेऊ नकोस. जे सत्य आहे ते सत्यपणे बोलावे. आणि जे असत्य आहे ते सर्व सोडून द्यावे. भगवंत हा सत्य आहे व जग हे असत्य आहे.(१९ )

२०

**बहू हिंपुटी होइजे मायपोटीं । नको रे मना यातना तेचि मोठी ।**
**निरोधें पचे कोंडिलें गर्भवासी । अधोमूख रे दु:ख त्या बाळकासी ॥**

गर्भवासात, आईच्या उदरात असताना जीवाला फार यातना सहन कराव्या

लागतात. गर्भामध्ये असताना तोंड खाली करून सर्व बाजूने वेढल्यामुळे जीव उकडून निघतो.म्हणून गर्भवास दु:खमय आहे.(२०)

२१

**मना वासना चूकवी येराझरा । मना कामना सांडि रे द्रव्यदारा ।**
**मना यातना थोर हे गर्भवासी । मना सज्जना भेटवी राघवासी ॥**

वासनेमुळे जन्म-मरणाच्या फेऱ्यात जीव सापडतो. म्हणून पैशाचा लोभ व कामवासना यांमध्ये गुरफटू नकोस. वासनेमुळे गर्भवास घडतो, आणि गर्भवासामध्ये अत्यंत यातना असतात. म्हणून हे मना, वासनेचा त्याग करून ईश्वराची भेट घडवून आण.(२१)

२२

**मना सज्जना हीत माझें करावें । रघूनायका दृढ चित्तीं धरावे ।**
**महाराज तो स्वामी वायुसुताचा । मना उद्धरी नाथ लोकत्रयाचा ॥**

हे माझ्या सज्जन मना, प्रभू रामाला माझ्या अंत:करणात दृढपणे धरून ठेवून माझे कल्याण कर. कारण हनुमानाचा स्वामी प्रभू राम हा त्रैलोक्याचा स्वामी असून तो लोकांचा उद्धार करणारा आहे.(२२)

२३

**न बोले मना राघवेवीण कांही । जनी वाऊगें बोलतां सूख नाही ।**
**घडीने घडी काळ आयुष्य नेतो । देहान्तीं तुला कोण सोडूं पहातो ? ॥**

हे मना, प्रभू रामाखेरीज इतर कशाबद्दलही बोलू नये. बाष्फळ बडबड केल्याने सुख मिळत नाही. काल हा क्षणाक्षणाने आयुष्य घेऊन जात आहे. मृत्यूच्या वेळी तुझ्या मदतीला धावणारा भगवंताशिवाय कोण बरे आहे ?(२३)

२४

**रघूनायकावीण वायां शिणावें । जनासारखें व्यर्थ कां वोसणावें ?**
**सदासर्वदा नाम वाचें वसो दे । अहंता मनीं पापिणी ते नसो दे ॥**

रामाखेरीज काही करणे म्हणजे व्यर्थ शिणण्यासारखे आहे. सामान्य संसारी लोकांप्रमाणेच फुकटची बडबड करू नये. जिभेने नेहमी भगवंताचे नामस्मरण करावे आणि पापमूलक अहंकार मनात कधीही बाळगू नये.(२४)

२५

**मना वीट मानूं नको बोलण्याचा । पुढे मागुता राम जोडेल कैचा ।**
**सुखाची घडी लोटता सूख आहे । पुढें सर्व जाईल काहीं न राहे ॥**

हे मना, माझ्या बोलण्याचा वीट मानू नकोस. अरे, मी सांगतो तसे वागला नाहीस तर भगवंत कसा भेटेल ? आज प्रपंचात सुखाचा काळ आहे, पण हा सुखाचा

काळ संपल्यावर सुख कोठचे? नंतर सर्व नाहीसे होईल. काहीही उरणार नाही. हे ध्यानी घे.(२५)

२६

**देहे रक्षणाकारणें यत्न केला । परी शेवटी काळ घेवोनि गेला ।**
**करी रे मना भक्ति या राघवाची । पुढे अंतरी सोडी चिंता भवाची ॥**

देहाच्या रक्षणाचा कितीही प्रयत्न केला तरी शेवटी काळ जिवाला घेऊन जातो. तेव्हा हे मना, रामाची भक्ती कर आणि प्रपंचाची काळजी सोडून दे.(२६)

२७

**भवाच्या भयें काय भीतोस लंडी । धरी रे मना धीर धाकासि सांडी**
**रघूनायकासारिखा स्वामी शीरीं । नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी ॥**

प्रपंचाच्या भीतीने नामर्दाप्रमाणे काय भितोस ? धीर धर आणि धास्ती सोडून दे. प्रभू रामासारखा रक्षणकर्ता तुझ्या शिरावर आहे. जरी यम तुझ्यावर रागावला, तरी तो राम तुझी उपेक्षा करणार नाही.(२७)

२८

**दीनानाथ हा राम कोदंडधारी । पुढें देखतां काळ पोटीं थरारी ।**
**जना वाक्य नेमस्त हें सत्य मानी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥**

कोदंडधारी राम हा अनाथांचा नाथ आहे. त्याला पाहून यमराजही घाबरतो. हे माझे वचन निश्चित मान, की राम आपल्या भक्ताचे रक्षण करतो. तो कधीही आपल्या भक्ताची उपेक्षा करीत नाही.(२८)

२९

**पदीं राघवाचें सदा ब्रीद गाजे । बळें भक्तरीपूशिरीं कांबि वाजे ।**
**पुरी वाहिली सर्व जेणें विमानीं । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥**

प्रभू रामाच्या पायातील तोडर हे जाहीर करतो की भक्तांचे रक्षण करणे हे प्रभू रामाचे ब्रीद आहे. जे भक्तांचे शत्रू असतात त्यांच्या डोक्यावर राम आपल्या धनुष्य-दंडाचा प्रहार करून त्यांचा नायनाट करतो. भक्तांविषयी अभिमान बाळगणारा राम हा भक्तांची कधीही उपेक्षा करीत नाही.(२९)

३०

**समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळी कोण आहे ?**
**जयाची लिळा वर्णिती लोक तीन्ही । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥**

समर्थ असलेल्या भगवंताच्या भक्ताकडे वाकड्या नजरेने बघणारा जगात कोणीही नाही. त्रैलोक्यातील लोक ज्याची लीला गातात, तो प्रभू राम हा भक्तांची

उपेक्षा कधीच करीत नाही कारण तो भक्तांचा अभिमान बाळगणारा आहे.(३०)

३१

**महा संकटीं सोडिले देव जेणें । प्रतापें बळें आगळा सर्वगूणें ।**
**जयातें स्मरे शैलजा शूलपाणी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥**

प्रभू राम हा प्रतापशाली, बलवान आणि सर्वगुणसंपन्न असा आहे. रावणाने सर्व देवांना बंदी केले होते, तेव्हा रामानेच त्यांना त्या महासंकटातून सोडविले. शिव आणि पार्वती त्याचे स्मरण करतात. तो भक्तांचा अभिमान बाळगणारा आहे.(३१)

३२

**अहिल्या शिळा राघवें मुक्त केली । पदीं लागतां दिव्य होऊनि गेली ।**
**जया वर्णिता शीणली वेदवाणी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥**

शापित अहल्या शिळा होऊन पडली होती. तिचा उद्धार प्रभू रामाने केला. त्याचा पद-स्पर्श होताच तिला दिव्य गती लाभली. ज्या प्रभू रामाचे वर्णन करताना वेदवाणी शिणून जाते, तो राम आपल्या भक्ताची उपेक्षा कधीही करीत नाही. कारण तो भक्ताभिमानी आहे.(३२)

३३

**वसे मेरुमांदार हे सृष्टिलीळा । शशी सूर्य तारांगणें मेघमाळा ।**
**चिरंजीव केले जनीं दास दोन्ही । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥**

ईश्वराने आपल्या लीलेने या सृष्टीची रचना केली. तिच्यामध्ये मेरु-मांदार इ. पर्वत, सूर्य-चंद्र, तारांगणे व मेघ-माला आहेत. प्रभू रामाने विभीषण आणि हनुमान या भक्तांना चिरंजीव बनविले. असा हा राम आपल्या भक्तांचा अभिमानी असल्यामुळे त्यांची उपेक्षा कधीही करीत नाही.(३३)

३४

**उपेक्षा कदा रामरूपी असेना । जिवां मानवां निश्चयो तो वसेना ।**
**शिरीं भार वाहे न बोले पुराणीं । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥**

प्रभू रामाकडून भक्ताची उपेक्षा कधीच होत नाही. पण मनुष्याच्या जिवास त्याची खात्री वाटत नाही. पुराणांमध्ये भगवंताची अशी वचने आहेत की, मी भक्ताची सर्व जबाबदारी घेतो. भक्तांचा अभिमान बाळगणारा भगवंत भक्ताची उपेक्षा कधीच करीत नाही.(३४)

३५

**असे हो जया अंतरी भाव जैसा । वसे हो तया अंतरी देव तैसा ।**
**अनन्यास रक्षीतसे चापपाणी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥**

भाव तसा देव. मनामध्ये जसा भक्तिभाव असतो, भगवंत हा तसा मनामध्ये वसतो. अनन्यभावनेने जो भक्ती करतो, त्याचे रक्षण धनुष्यधारी राम करीत असतो. भक्तांचा अभिमान बाळगणारा प्रभू राम त्यांची उपेक्षा कधी करीत नाही.(३५)

३६

**सदा सर्वदा देव सन्नीध आहे । कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे ।**
**सुखानंद आनंद कैवल्य दानी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥**

भगवंत हा नेहमी आपल्या जवळच असतो. तो दयाळू आहे. तो भक्तामध्ये थोडेसे धैर्य आहे की नाही, याची परीक्षा घेतो. तो सुखमय आहे, आनंदमय आहे. तो भक्ताचा उद्धार करतो. तो भक्ताची उपेक्षा करीत नाही.(३६)

३७

**सदा चक्रवाकासी मार्तंड जैसा । उडी घालितो संकटीं स्वामि तैसा ।**
**हरीभक्तिचा घाव गाजे निशाणीं । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥**

अंधारामध्ये चक्रवाक पक्ष्याची जोडी विरहाच्या संकटामुळे फार दुःखी होते. सूर्य प्रकट होऊन त्यांना संकटातून सोडवितो. त्याप्रमाणे संकटाचे प्रसंगी भक्तास सोडविण्यासाठी भगवंत धावून येतो. हरि-भक्तीचा डांगोरा सांगत आहे की भक्ताभिमानी भगवंत भक्तांची उपेक्षा कधीही करीत नाही.(३७)

३८

**मना प्रार्थना तूजला एक आहे । रघूराज थक्कीत होऊनि पाहे ।**
**अवज्ञा कदा हो येदर्थीं न कीजे । मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ॥**

हे मना, तुला एक विनंती आहे की प्रभू रामाकडे आश्चर्याने थक्क होऊन पाहात राहा. त्याची महानता व दिव्यता पाहून त्याच्याजवळच कायमची वस्ती कर. माझ्या या विनंतीचा अव्हेर करू नकोस.(३८)

३९

**जया वर्णिती वेदशास्त्रेंपुराणे । जयाचेनि योगें समाधान बाणें ।**
**तयालागी हे सर्व चांचल्य दीजे । मना सज्जना राघवी वस्ती कीजे ॥**

वेद, शास्त्रे व पुराणे ज्या ईश्वराचे वर्णन करतात, ज्या ईश्वराच्या प्राप्तीमुळे समाधान मिळते, त्या प्रभू रामाला हे मना, तू आपला चंचलपणा अर्पण कर व त्याच्याजवळच तू वस्ती कर.(३९)

४०

**मना पाविजे सर्वही सूख जेथें । अती आदरे ठेविजे लक्ष तेथें ।**
**विवेकें कुडी कल्पना पालटीजे । मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ॥**

हे मना, ज्या ठिकाणी संपूर्ण सुख लाभते, त्या प्रभू रामाच्या ठायी तू पूज्य भावनेने आपले लक्ष लाव. विवेकपूर्वक वाईट बुद्धी टाकून दे आणि प्रभू रामाच्याजवळ तू कायमचा राहा.(४०)

४१

**बहू हिंडता सौख्य होणार नाहीं । शिणावें परी नातुडे हीत काहीं ।**
**विचारें बरें अंतरा बोधवीजे । मना सज्जना राघवी वस्ति कीजे ॥**

हे मना, सैरावैरा भटकण्याने कधीही सुख मिळणार नाही. प्रपंचाचे मागे लागून भटकण्यात व्यर्थ दमशील, कल्याण काही होणार नाही. विचार कर. आपली आपणच समजूत करून घे आणि तू प्रभू रामाच्याजवळ कायमचा राहा.(४१)

४२

**बहूतांपरी हेचिं आतां धरावें । रघूनायका आपुलेसें करावे ।**
**दीनानाथ हे तोडरीं ब्रीद गाजे । मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ॥**

हे मना, तुला पुष्कळ प्रकारे सांगून झाले. आता एकच लक्षात ठेव. प्रभू रामाला वश करून घे. दीनानाथ हे त्याचे ब्रीद आहे. तो अनाथांचा नाथ आहे, तेव्हा त्याच्याजवळ तू कायमचा राहा.(४२)

४३

**मना सज्जना एक जीवीं धरावें । जनी आपुलें हीत तुवां करावें ।**
**रघुनायकावीण बोलों नको हो । सदा मानसीं तो निजध्यास राहो ॥**

हे माझ्या सज्जन मना, एकाच गोष्टीची खूणगाठ जीवाशी बांधून ठेव. जीवनामध्ये तू आपले कल्याण साधून घे. त्यासाठी प्रभू रामावाचून इतर काहीही बोलण्याचे सोडून दे व मनामध्ये सतत रामाचे अनुसंधान ठेवण्याचा प्रयत्न कर.(४३)

४४

**मना रे जनीं मौन्य मुद्रा धरावी । कथा आदरें राघवाची करावी ।**
**नसे राम तें धाम सोडोनी द्यावें । सुखालागि आरण्य सेवीत जावें ॥**

हे मना, व्यावहारिक जगात फारसे बोलू नये. गप्प बसावे. बोलायचे असेल तर मुखाने प्रभू रामाचे गुणगान करावे. जेथे राम नाही, रामाची भक्ती नाही, ते घर सोडून जावे आणि सुखासाठी अरण्यात जावे.(४४)

४५

**जयाचेनि संगे समाधान भंगे । अहंता अकस्मात येऊनि लागे ।**
**तये संगतीची जनीं कोण गोडी । जिये संगतीनें मति राम सोडी ॥**

ज्या संगतीमुळे मनाला समाधान मिळत नाही, जिच्यामुळे अहंकार व

देहबुद्धी वाढते, ज्या संगतीमुळे मनुष्याची बुद्धी भगवंतापासून दूर नेते, अशा संगतीमध्ये गोडी कसली ?(४५)

४६

**मना जे घडी राघवेवीण गेली । जनीं आपुली ते तुवां हानि केली ।**
**रघुनायकावीण तो शीण आहे । जनीं दक्ष तो लक्ष लावूनि पाहे ॥**

हे मना, भगवंताच्या विस्मरणात जो काळ जातो तो आयुष्यामध्ये वाया जातो. भगवंताचे स्मरण न केल्यामुळे आपणच आपले नुकसान करून घेतो. भगवंताच्या भक्तीशिवाय हा प्रपंच म्हणजे व्यर्थ श्रम होय. जो तत्पर असतो, तो प्रपंचामध्ये राहूनही आपले लक्ष भगवंताकडे लावतो.(४६)

४७

**मनीं लोचनीं श्रीहरी तोचि पाहे । जनी जाणतां भक्त होऊनि राहे ।**
**गुणी प्रीति राखे क्रमूं साधनाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥**

ज्याला मनामध्ये भगवंताचे रूप दिसते आणि डोळ्यांनी पाहताना सर्वत्र ईश्वरच दिसू लागतो, तो जाणता भक्त होय. जो सगुण रूपावर प्रेम करतो व साधन चालू ठेवतो, तो भगवंताचा भक्त जगामध्ये धन्य होय.(४७)

४८

**सदा देवकाजी झिजे देह ज्याचा । सदा रामनामें वदें नित्य वाचा ।**
**स्वधर्मेंची चाले सदा उत्तमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥**

जो भगवंताच्या कार्यासाठी देह झिजवतो, जो मुखाने नित्य राम-नाम घेतो आणि जो आपले कर्तव्य उत्तम रीतीने पार पाडतो, तो भक्त धन्य होय.(४८)

४९

**सदा बोलण्यासारिखें चालताहे । अनेकी सदा एक देवासि पाहे ।**
**सगूणी भजे लेश नाही भ्रमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥**

जो जसा बोलतो, तसाच जो वागतो, जो अनेक देवांच्यामध्ये एकच भगवंत व्यापलेला आहे, असे पाहातो, जो सगुण रूपाची भक्ती करतो, परंतु ज्याच्या मनात भगवंताच्या खऱ्या रूपाबद्दलचा भ्रम नसतो, तो देवाचा भक्त जगामध्ये धन्य होय.(४९)

५०

**नसे अंतरी कामकारी विकारी । उदासीन जो तापसी ब्रह्मचारी ।**
**निवाला मनीं लेश नाहीं तमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥**

विकार निर्माण करणारी काम-वासना ज्याच्या मनात नसते, जो विरक्त असतो, तपस्वी असतो व ब्रह्मचर्याचे पालन करणारा असतो, ज्याच्या मनात क्रोधाचा

अंधार नसतो, तो देवांचा भक्त या जगामध्ये धन्य होय.(५०)

५१

**मदें मत्सरें सांडिली स्वार्थबुद्धि । प्रपंचीक नाही जयातें उपाधि ।**
**सदा बोलणें नम्र वाचा सुवाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥**

ज्याने अहंकार, मत्सर व स्वार्थाचा त्याग केला आहे, ज्याला प्रपंचाचे पाश नाहीत, जो नेहमी नम्रतेने व मधुर वाणीने बोलतो तो देवाचा भक्त या जगामध्ये धन्य होय.(५१)

५२

**क्रमी वेळ जो तत्त्वचिंतानुवादें । न लिपें कदा दंभवादे विवादें ।**
**करी सूखसंवाद जो ऊगमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥**

जो आपला वेळ परमेश्वराच्या चिंतनामध्ये घालवितो, फसव्या वाद-विवादात जो पडत नाही, परमात्म-तत्त्वाबद्दल चर्चा करताना ज्याला आनंद होतो, तो भक्त या जगी धन्य होय.(५२)

५३

**सदा आर्जवी प्रीय जो सर्व लोकी । सदा सर्वदा सत्यवादी विवेकी ।**
**न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥**

जो निष्कपट वागण्यामुळे जगात प्रिय होतो, जो नेहमी विवेकाने वागतो, खरे बोलणारा असतो. व जो कधी खोटे आणि विसंगत बोलत नाही, तो देवाचा भक्त या जगी धन्य होय.(५३)

५४

**सदा सेवि आरण्य तारुण्यकाळीं । मिळेना कदा कल्पनेचेनि मेळीं ।**
**वळेना मनीं निश्चयो दृढ ज्याचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥**

जो माणूस तरुणपणी एकांतवासात राहून साधना करतो, तो परमेश्वराबद्दलच्या कल्पनेच्या गोंधळात पडत नाही. त्याने परमेश्वराची अनुभूती घेतलेली असते. म्हणून त्याची श्रद्धा दृढ असते. असा भक्त धन्य होय.(५४)

५५

**नसे मानसीं नष्ट आशा दुराशा । वसें अंतरी प्रेमपाशा पिपाशा ।**
**ऋणी देव हा भक्तिभावें जयाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥**

ज्याच्या दुष्ट वासना आणि भोगवासना नाहीशा झालेल्या आहेत आणि ईश्वराला प्रेमपाशाने बद्ध करण्याची तळमळ ज़्याला आहे, त्याचा भक्तिभाव पाहून स्वत: भगवंत हासुद्धा त्याचा ऋणी होऊन जातो. असा भक्त धन्य होय.(५५)

५६

**दिनाचा दयाळू मनाचा मवाळू । स्नेहाळू कृपाळू जनीं दास पाळू ।**
**तया अंतरी क्रोध संताप कैंचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।**

ज्याचे हृदय मायाळू आहे, जो अनाथांवर व गरीबांवर दया करतो, जो प्रेमळ आहे, जो कृपाळू आहे आणि जो गरीबांचा सांभाळ करतो. त्याच्या मनात दुसऱ्याबद्दल राग मुळीच नसतो. असा भक्त धन्य होय.(५६)

५७

**जगीं होइजे धन्य या रामनामें । क्रिया भक्ति ऊपासना नित्यनेमें ।**
**उदासीनता तत्वता सार आहे । सदा सर्वदा मोकळी वृत्ति राहे ।।**

मनुष्याला जर जीवनाचे सार्थक व्हावे असे वाटत असेल तर रामनाम घ्यावे. धर्म-कर्मे करावीत, परमेश्वराची भक्ती करावी, नित्य नियमाने उपासना करावी. परमेश्वराबद्दल आसक्ती बाळगावी व प्रपंचाबद्दल अनासक्ती ठेवावी. म्हणजे मन मोकळे होऊन सुखी बनते.(५७)

५८

**नको वासना वीषईं वृत्तिरूपें । पदार्थीं जडे कामना पूर्वपापें ।**
**सदा राम निष्काम चिंतीत जावा । मना कल्पनालेश तो ही नसावा ।।**

हे मना, लौकिक गोष्टींबद्दल वासना बाळगल्यास ती वृत्ती बनून जाते. पूर्व जन्मांतील पापांमुळे वैषयिक पदार्थांबद्दल इच्छा होते. म्हणून नेहमी भगवंताचे चिंतन निष्काम भावनेने करावे. कल्पनेच्या राज्यात मनास भटकू देऊ नये.(५८)

५९

**मना कल्पना कल्पितां कल्पकोटी । नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी ।**
**मनीं कामना राम नाहीं जयाला । अती आदरें प्रीति नाही तयाला ।।**

हे मना, कल्पना केल्यामुळे कधी भगवंताची भेट घडत नाही. ज्याच्या मनात रामाची इच्छा नाही, त्याच्या मनात रामाबद्दल आदरयुक्त प्रेम उत्पन्न होणार नाही.

६०

**मना राम कल्पतरू कामधेनु । निधी सार चिंतामणी काय वानूं ?**
**जयाचेनि योगें घडे सर्व सत्ता । तया साम्यता कायसी कोण आता ?।।**

हे मना, भगवंताचे वर्णन मी कसे करू ? त्याला कल्पतरू म्हणू की कामधेनू म्हणू ? त्याला चिंतामणी म्हणू की कुबेराचे भांडार म्हणू? की सारसर्वस्व म्हणू ? ज्याच्या सत्तेमुळे विश्वाचे व्यवहार घडतात. त्याची तुलना कशाने होऊ शकेल ? (६०)

६१

उभा कल्पवृक्षातळी दुःख वाहे । तया अंतरी सर्वदा तें चि आहे ।
जनीं सज्जनीं वाद हा वाढवावा । पुढें मागुता शोक जीवीं धरावा ॥

कल्पवृक्षाच्या खाली उभा राहून जर कोणी दुःख करू लागला तर त्याला दुःखच मिळणार. त्याप्रमाणे एखादा मनुष्य संताकडे गेला आणि वाद करू लागला तर त्याला दुःखच भोगावे लागणार.(६१)

६२

निजध्यास तो सर्व तूटोनि गेला । बळें अंतरी शोक संताप ठेला ।
सुखानंद आनंद भेदें बुडाला । मनी निश्चयो सर्व खेदें उडाला ॥

मनुष्य वादामध्ये पडला की त्याचे आत्मानुसंधान सुटून जाते आणि त्याच्या मनात शोक व संताप घुसतो. माझा-तुझा असा भेद उत्पन्न झाल्याने मनाचे समाधान लोप पावते आणि तो खेदामध्ये नाश पावतो.

६३

घरी कामधेनु पुढे ताक मागे । हरीबोध सांडूनि वेवाद लागे ।
करीं सार चिंतामणी काचखंडे । तया मागतां देत आहे उदंडे ॥

ज्या मनुष्याच्या घरात कामधेनू आहे, तो मनुष्य दुसऱ्याकडे ताक मागू लागला, तर ते किती हास्यास्पद आहे. तसेच स्वत:जवळ अंतर्यामी परमात्मा असताना त्याचे ज्ञान मिळवावयाचे सोडून फुकट वादविवाद करीत राहणे, हे हास्यास्पद आहे. आपल्या हाती चिंतामणी असताना त्याच्याकडे उत्कृष्ट काही न मागता काचेचे तुकडे मागितले तर ते उदंड मिळतील,पण त्यांचा उपयोग काय ? (६३)

६४

अती मूढ त्या दृढ बुधी असेना । अती काम त्या राम चिंतीं वसेना ।
अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा । अती वीषई सर्वदा दैन्यवाणा ॥

जो फार अज्ञानी असतो, त्याची बुद्धी स्थिर नसते. जो अत्यंत लंपट असतो, त्याच्या अंत:करणात राम वसत नाही, जो अत्यंत लोभी असतो त्याच्या मनाला कधी स्वस्थता लाभत नाही आणि जो अत्यंत विषय-लंपट असतो, तो लाचार जिणे जगतो.(६४)

६५

नको दैन्यवाणे जिणें भक्तिऊणें । अती मूर्ख त्या सर्वदा दुःख दूणें ।
धरी रे मना आदरें प्रीति रामीं । नको वासना हेमधामीं विरामीं ॥

भक्तिहीन असे लाचार जिणे नसावे. जो अत्यंत अज्ञानी असतो त्याला नेहमी दुप्पट दु:ख भोगावे लागते. म्हणून हे मना, भगवंतावर आदराच्या भावनेने प्रेम कर. ऐश्वर्यामध्ये लोळण्याची वासना धरू नकोस.(६५)

६६

**नव्हे सार संसार हा घोर आहे । मना सज्जना सत्य शोधूनि पाहे ।**
**जनीं वीष खातां पूढें सूख कैचें ? करी रे मना ध्यान या राघवाचें ॥**

हा संसार मोठा भयानक आहे. हा असार आहे. हे तू स्वत: विचार करून शोध म्हणजे समजेल. संसार विषमय आहे. विष खाल्ल्यास सुख कसे मिळेल? म्हणून रामाचे चिंतन करावे.(६६)

६७

**घनश्याम हा राम लावण्यरूपी । महां धीर गंभीर पूर्णप्रतापी ।**
**करी संकटीं सेवकाचा कुढावा । प्रभातें मनीं राम चिंतीत जावा ॥**

मेघाप्रमाणे सावळा असणारा राम हा मूर्तिमंत लावण्य होय. तो मोठा धीरगंभीर असून महाप्रतापी आहे. संकट आले असता तो भक्ताचे रक्षण करतो. म्हणून पहाटेच्या वेळी रामाचे चिंतन करावे.(६७)

६८

**बळे आगळा राम कोदंडधारी । महां काळ विक्राळ तो ही थरारी ।**
**पुढें मानवा किंकरा कोण केवा । प्रभातें मनीं राम चिंतीत जावा ॥**

धनुष्यधारी राम हा श्रेष्ठ सामर्थ्यशाली आहे. त्याच्यापुढे भयंकर असा महाप्रलयसुद्धा थरथरा कापत असतो. मग क्षुद्र मनुष्याचा त्याच्यापुढे काय पाड लागणार ? म्हणून पहाटेच्या वेळी रामाचे चिंतन करावे.(६८)

६९

**सुखानंदकारी निवारी भयातें । जगीं भक्तिभावें भजावे तयातें ।**
**विवेके तजावा अनाचार हेवा । प्रभातें मनी राम चिंतीत जावा ॥**

भगवंत हा सुख-आनंद देणारा आहे. तो भय निवारण करतो. म्हणून जीवनामध्ये भगवंताला मोठ्या भक्तीने भजावे. विवेक धारण करून अनाचार सोडावा व प्रात:काळी रामाचे ध्यान करावे.(६९)

७०

**सदा रामनामें वदा पूर्णकामें । कदा बाधिजेनापदा नित्यनेमें ।**
**मदालस्य हा सर्व सोडूनि द्यावा । प्रभातें मनी राम चिंतीत जावा ॥**

नेहमी मनापासून रामनाम घ्यावे. नित्यनेमाने नामस्मरण करणाऱ्याला

संकटांची बाधा होत नाही. अहंकार आणि आळस सोडून द्यावा व प्रात:काळी रामाचे ध्यान करावे.(७०)

७१

**जयाचेनि नामें महादोष जाती । जयाचेनि नामें गती पाविजेती ।**
**जयाचेनि नामें घडे पुण्यठेवा । प्रभातें मनी राम चिंतीत जावा ॥**

ज्याच्या नामस्मरणामुळे मोठमोठे दोष नाहीसे होतात, ज्याच्या नामस्मरणामुळे उत्तम गती प्राप्त होते आणि ज्याच्या नामस्मरणामुळे पुण्यसंचय होतो, त्या रामाचे पहाटेचे वेळी ध्यान करावे.(७१)

७२

**न वेचें कदा ग्रंथिचें अर्थ काहीं । मुखें नाम उच्चारितां कष्ट नाहीं ।**
**महां घोर संसार शत्रु जिणावा । प्रभातें मनी राम चिंतीत जावा ॥**

भगवंताचे नाम घेण्यास पदरचा पैसा खर्च होत नाही. मुखातून नाम घेण्यास कष्ट पडत नाहीत. म्हणून संसाररूपी भयंकर शत्रूला नामस्मरणाने जिंकावे. प्रात:काळी रामाचे ध्यान करावे.(७२)

७३

**देहेदंडणेचें महां दु:ख आहे । महां दु:ख ते नाम घेतां न राहे ।**
**सदाशीव चिंतीतसे देवदेवा । प्रभातें मनी राम चिंतीत जावा ॥**

अनेक प्रकारच्या साधना करण्यामध्ये देहाला मोठे दु:ख भोगावे लागते. नाम घेण्यामध्ये तसे दु:ख भोगावे लागत नाही. प्रत्यक्ष शिवशंकर हा प्रभू रामाचे चिंतन करतो, म्हणून प्रात:काळी रामाचे ध्यान करावे.(७३)

७४

**बहूतांपरी संकटें साधनाची । व्रतें दान उद्यापनें ते धनाची ।**
**दिनाचा दयाळू मनीं आठवावा । प्रभातें मनीं राम चिंतीत जावा ॥**

भगवंताच्या प्राप्तीसाठी काही साधन करावयाचे म्हटले तर फार अडचणी असतात. व्रते, दाने, उद्यापने करायची म्हटली तर पैसा लागतो. म्हणून दीनांचा दयाळू असलेल्या रामाचे स्मरण मनात करावे. पहाटेच्यावेळी मनात रामाचे चिंतन करावे. त्याला काही लागत नाही.(७४)

७५

**समस्तामधें सार साचार आहे । कळेना तरी सर्व शोधून पाहें ।**
**जिवा संशयो वाउगा तो तजावा । प्रभातें मनी राम चिंतीत जावा ॥**

ईश्वर-प्राप्तीच्या सर्व साधनांमध्ये नाम-स्मरण हे खरोखर श्रेष्ठ साधन

आहे. हे जर पटत नसेल, तर सर्व धार्मिक ग्रंथामध्ये पाहावे. श्रुती, स्मृती, पुराण, संतांची वचने या सर्वांमध्ये नाम-स्मरणाचे महत्त्व सांगितले आहे. मनामधला अयोग्य संशय काढून टाकावा व पहाटेच्या वेळी रामाचे चिंतन करावे.(७५)

७६

**नव्हे कर्म ना धर्म ना योग कांही । नव्हे भोग ना त्याग ना सांग पाहीं ।**
**म्हणे दास विश्वास नामीं धरावा । प्रभातें मनीं राम चिंतीत जावा ॥**

जीवनामध्ये कर्ममार्गाचे आचरण होत नाही, धर्माचे पालन होत नाही, योग-साधनाही घडत नाही. खरे तर भोगही घडत नाहीत आणि त्यागही घडत नाही म्हणून रामनामावर माणसाने विश्वास ठेवावा व पहाटेच्यावेळी रामाचे चिंतन करावे.(७६)

७७

**करी काम निःकाम या राघवाचें । करी रूप स्वरूप सर्वां जिवांचे ।**
**करीं छेद निर्द्वंद्व हे गूण गातां । हरीकीर्तनीं वृत्तिविश्वास होतां ॥**

भगवंताबद्दल आसक्ती निर्माण झाली की मनुष्य विरक्त बनू लागतो. तो निष्काम कर्म करू लागतो. सर्व जीव हे ब्रह्मस्वरूप असल्याचे ज्याला ज्ञान होते. तो मनुष्य भगवंताचे गुणगान करू लागला की भेदभाव नाहीसे होतात व सुख-दुःख या द्वंदांच्या पलीकडे पोहोचतो. भगवंतांच्या कीर्तनामध्ये विश्वास जडला की असे घडते.(७७)

७८

**अहो ज्या नरा रामविश्वास नाहीं । तया पामरा बाधिजे सर्व काहीं ।**
**महाराज तो स्वामि कैवल्यदाता । वृथा वाहणें देहेसंसारचिंता ॥**

ज्या मनुष्याला रामाबद्दल विश्वास वाटत नाही त्या बिचाऱ्याला सर्व दुःखे भोगावी लागतात. प्रभू राम हा त्रैलोक्याचा स्वामी आहे, तोच मोक्षदाता आहे. म्हणून देहाची व संसाराची काळजी करणे व्यर्थ होय.(७८)

७९

**मना पावना भावना राघवाची । धरी अंतरी सोडिं चिंता भवाची ।**
**भवाची जिवा मानवा भूलि ठेली । नसे वस्तुची धारणा वेर्थ गेली ॥**

हे मना, भगवंताबद्दलची भक्ति-भावना ही पवित्र करणारी आहे. ती मनात बाळग आणि संसाराची चिंता करणे सोडून दे. माणसाच्या मनाला संसाराची भुरळ पडते व तो त्याला खरा मानू लागतो. पण जो संसार खरा नाही, तो मनात धरून ठेवला तर फसगत होणारच.(७९)

८०

**धरा श्रीवरा त्या हरा अंतरातें । तरा दुस्तरा त्या परा सागरातें ।**
**सदा वीसरा त्या भरा दुर्भरातें । करा नीकरा त्या खरा मछरातें ॥**

भगवान शंकराने ज्या श्रीहरीला आपल्या हृदयात धारण केले आहे, त्या श्रीहरीला आपल्या मनामध्ये विराजमान करा, म्हणजे हा कठीण असा भवसागर पार करता येईल. पोट पूर्णपणे भरणे, लौकिक गरजा पूर्ण करणे, हे महाकठीण कर्म आहे, ते थोडे विसरायला शिकावे आणि मत्सराचा निकराने नाश करावा.(८०)

८१

**मना मछरें नाम सांडू नको हो । अती आदरें हा निजध्यास राहो ।**
**समस्तांमध्ये नाम हें सार आहे । दुजी तूळणा तूळीतां ही न साहे ॥**

हे मना, नामाचा मत्सर करून ते सोडून देऊ नकोस. नामाबद्दल पूज्य भाव बाळगून त्याचा ध्यास घ्यावा. सर्व साधनांमध्ये नाम हे सार आहे. त्याची कोणत्याही साधनाशी तुलना करता येणे शक्य नाही.(८१)

८२

**बहू नाम या रामनामीं तुळेना । अभाग्या नरा पामरा हे कळेना ।**
**विषा औषध घेतलें पार्वतीशें । जिवा मानवा किंकरा कोण पूसे ? ॥**

भगवंताची अनेक नामे आहेत, पण त्यात रामनाम हे श्रेष्ठ आहे. परंतु ही गोष्ट बिचाऱ्या मनुष्यास कळत नाही. हलाहल विषाचा दाह नाहीसा करण्यासाठी शंकराने राम-नाम घेतले, तेथे बापड्या मनुष्याचे काय? त्याला राम-नाम घ्यावेच लागते.(८२)

८३

**जेणे जाळिला काम तो राम ध्यातो । उमेसी अती आदरें गूण गातो ।**
**बहू ज्ञान वैराग्य सामर्थ्य जेथें । परी अंतरी नामविश्वास तेथें ॥**

ज्या शंकराने कामदेवास जाळून टाकले, तो रामाचे ध्यान करतो. तो शंकर मोठ्या पूज्य भावनेने पार्वतीला रामाचे गुण-वर्णन सांगतो. शंकराचे ठिकाणी मोठे ज्ञान, वैराग्य आणि सामर्थ्य वसते, तरीही त्याच्या मनात नामाबद्दलचा दृढ विश्वास आहे.(८३)

८४

**विठोनें शिरीं वाहिला देवराणा । तया अंतरी ध्यास रे त्यासि नेणा ।**
**निवाला स्वयें तापसी चंद्रमौळी । जिवां सोडवी राम हा अंतकाळी ॥**

पांडुरंगाने महादेवाला डोक्यावर धारण केले आहे. त्या महादेवाला प्रभू

रामाचा ध्यास लागलेला आहे, हे तुम्हांला ठाऊक नाही काय ? राम-नामामुळे महादेवाचा दाह दूर झाला. तो रामच तुम्हांला अंतकाळी सोडविणारा आहे, म्हणून त्याचा नाम-जप करा.(८४)

८५

**भजा राम विश्राम योगश्वरांचा । जपू नेमिला नेम गौरीहराचा ।**
**स्वयें नीववी तापसी चंद्रमौळी । तुम्हा सोडवी राम हा अंतकाळीं ॥**

प्रभू रामाचे भजन केल्यामुळे श्रेष्ठ योग्यांनाही शांतता लाभते. महादेव हा नित्य नेमाने राम-नामाचा जप करतो. राम-नामामुळे महादेवाचा दाह दूर झाला. त्याला शांतता लाभली, तुम्हांला अंतकाळी रामच तारणारा आहे, तेव्हा त्याचा जप करा.(८५)

८६

**मुखीं राम विश्राम तेंथेचि आहे । सदानंद आनंद सेऊनि राहे ।**
**तयावीण तो सीण संदेहकारी । निजधाम हें नाम शोकापहारी ॥**

ज्याच्या मुखात राम-नाम असते, त्याच्या हृदयात समाधान असते. त्याला नेहमी आनंद लाभतो. ते सोडून केलेला सर्व खटाटोप हा संशयास्पद असतो. परंतु नाम हे रामाचे घर आहे. तेथे तो नांदतो, म्हणून नाम हे शोक दूर करणारे आहे.(८६)

८७

**मुखीं राम त्या काम बाधूं शकेना । गुणें इष्ट धारिष्ट त्याचें चुकेना ।**
**हरीभक्त तो शक्त कामास मारी । जगीं धन्य तो मारुती ब्रह्मचारी ॥**

ज्याच्या मुखात राम-नाम असते त्याला काम-वासना बाधू शकत नाही. त्या मनुष्यास आपल्या सद्गुणांमुळे काम-विकाराशी लढण्याचे धैर्य प्राप्त होते. जो भगवंतांचा भक्त असतो तो काम-विकारास मारण्यास समर्थ असतो. असा ब्रह्मचारी मारुती हा जगामध्ये धन्य होय.(८७)

८८

**बहू चांगले नाम या राघवाचे । अती साजिरें स्वल्प सोपें फुकाचें ।**
**करी मूळ निर्मूळ घेतां भवाचे । जिवां मानवां हें चि कैवल्य साचें ॥**

रामनाम हे फार चांगले आहे. ते मोठे सुंदर, छोटे, सोपे व बिनखर्चाचे आहे. त्यामुळे संसार-तापाचा समूळ नाश होतो. मानवी जीवांना रामनामामुळे स्वानंद मिळतो.(८८)

८९

**जनीं भोजनीं नाम वाचें वदावें । अती आदरें गद्य घोषें म्हणावें ।**

**हरीचिंतनें अन्न जेवीत जावें । तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ॥**

समाजात वावरत असताना व भोजन करताना मुखाने रामनाम घ्यावे. ते आदरपूर्वक, स्पष्ट व मोठ्याने म्हणावे. भगवंताचे चिंतन करीत अन्न सेवन करीत जावे. असे केल्यामुळे सहजपणे भगवंताची प्राप्ती होते.(८९)

९०

**न ये राम वाणी तया थोर हाणी । जनीं वेर्थ प्राणी तया नाम काणी ।**
**हरीनाम हे वेदशास्त्रीं पुराणीं । बहू आगळें बोलिली व्यासवाणी ॥**

ज्याच्या वाणीमध्ये रामाचे नाम येत नाही, त्याचे अतोनात नुकसान होत असते. अशा मनुष्याचे जीवन व्यर्थ असते. ते कुचकामी असते. वेदशास्त्रामध्ये व पुराणांमधून रामनाम हे श्रेष्ठ असल्याचे महर्षी व्यासांनी सांगून ठेवले आहे.(९०)

९१

**नको वीट मानूं रघूनायेकाचा । अती आदरें बोलिजे राम वाचा ।**
**न वेचे मुखीं सांपडे रे फुकाचा । करी घोष त्या जानकीवल्लभाचा ॥**

हे मना, भगवंताचा कंटाळा करू नकोस. अत्यंत आदरपूर्वक वाणीने रामनाम घे. त्यात तुझे काहीही खर्च होत नाही. नाम घेतल्यामुळे फुकटात भगवंताचा लाभ होतो. म्हणून त्याच्या नामाचा जप करावा.(९१)

९२

**अती आदरें सर्व ही नामघोषें । गिरीकंदरें जाइजे दूरि दोषें ।**
**हरी तिष्ठतु तोषला नामतोषें । विशेषें हरा मानसी रामपीसें ॥**

जो कोणी अत्यंत आदराने नामाचा गजर करतो, त्याचे सर्व दोष गिरिकंदरी पळून जातात. जेथे नामाचा गजर होत असतो, तेथे भगवंत हा संतुष्ट होऊन उभा असतो. महादेवाच्या मनाला तर राम-नामाचे वेड लागले आहे.(९२)

९३

**जगीं पाहतां देव हा अन्नदाता । तया लागली तत्वता सार चिंता ।**
**तयाचें मुखी नाम घेता फुकाचें । मना सांग पां रे तुझें काय वेचें ॥**

जगाकडे पाहिले असता असे दिसते की भगवंत हा सर्व जीवांना अन्न पुरवून त्यांचे पोषण करतो. त्याला सर्व जीवांची काळजी असते. हे मना, त्या भगवंताचे फुकटचे नाम घेण्यास तुझे काय जाते ?(९३)

९४

**तिन्ही लोक जाळूं शके कोप येतां । निवाला हरू तो मुखें नाम घेतां ।**
**जपें आदरें पार्वती विश्वमाता । म्हणोनी म्हणा तेंचि हे नाम आतां ॥**

शंकराला राग आला तर तो तिन्ही लोकांना जाळून टाकू शकतो. पण त्याचा स्वतःचा दाह रामनामामुळे शमला. त्या रामनामाचा जप जगदंबा पार्वती मोट्ठ्या आदराने करते. म्हणून तेच नाम आता आदराने म्हणा.(९४)

९५

**अजामेळ पापी वदे पुत्रकामें । तया मुक्ति नारायणाचेनि नामें ।**
**शुकाकारणें कुंटणी राम वाणी । मुखें बोलतां ख्याति झाली पुराणीं ॥**

अजामिळ नावाच्या महापातक्याने अंतकाळी आपल्या नारायण नावाच्या मुलाला व्याकुळ होऊन हाक मारली. मुलाच्या निमित्ताने देवाचे नाम मुखात आले, त्यामुळे त्याला मुक्ती मिळाली. एक गणिका आपल्या पोपटाला राम-नाम शिकवायची, त्यामुळे तिचा उद्धार झाला आणि त्यामुळे पुराणांनी तिची कीर्ती गायली आहे.(९५)

९६

**महां भक्त प्रह्लाद हा दैत्यकूळीं । जपे रामनामावळीं नित्यकाळीं ।**
**पिता पापरूपी तया देखवेना । जनीं दैत्य तो नाम मुखे म्हणेना ॥**

महान भक्त प्रह्लाद हा दैत्यकुळात जन्मास आला, परंतु तो सदासर्वदा रामनामाचा जप करीत असे. त्याचा बाप हिरण्यकशिपू हा अत्यंत पापी होता. त्याने स्वतः कधी नामस्मरण केले नाही आणि प्रह्लादाने केलेले नामस्मरण त्याला कधी पाहवत नसे. तो दैत्यच राहिला.(९६)

९७

**मुखीं नाम नाहीं तया मुक्ति कैंची । अहंतागुणें यातना ते फुकाची ।**
**पुढें अंत येईल तो देवराणा । म्हणोनी म्हणा रे म्हणा देवराणा ॥**

ज्याच्या मुखी रामनाम येत नाही, त्याला मुक्ती कोठून मिळणार ? अहंकाराने तो विनाकरण यातना भोगीत असतो. अशा मनुष्यास दैन्यवाणे मरण येते. म्हणून भगवंतांचे नाव घेत राहा.(९७)

९८

**हरीनाम नेमस्त पाषाण तारी । बहु तारिले मानवदेहधारी ।**
**तया रामनामीं सदा जो विकल्पी । वदेना कदा जीव तो पापरूपी ॥**

रामनामामुळे सेतुबंधनाचे प्रसंगी पाषाण तरंगू लागले. या नामामुळे अनेक मनुष्यांचा उद्धार झाला. ज्याला वाटते की नामामुळे काय होणार? तो मनुष्य पापी असतो व तो मुखाने कधी नाम घेत नाही.(९८)

९९

**जगीं धन्य वाराणसी पुण्यरासी । तयेमाजिं जातां गती पूर्वजांसी ।**

**मुखें रामनामावळी नित्यकाळीं । जिवा हीत सांगे सदा चंद्रमौळी ॥**

पुण्याने भरलेली शिवनगरी काशी ही धन्य होय. तेथील यात्रा केल्याने स्वत:स व पूर्वजांनाही उत्तम गती प्राप्त होते. तेथे भगवान शंकर हा सर्व जीवांना हिताची गोष्ट सांगत असतो की मुखाने नेहमी रामनाम घ्या.(९९)

१००

**येथासांग रे कर्म तें हि घडेना । घडे धर्म तें पुण्य गांठी पडेना ।**
**दया पाहतां सर्वभूतीं असेना । फुकाचे मुखीं नाम तें हि वसेना ॥**

मनुष्याच्या हातून यथासांग कर्म घडत नाही. जे घडते त्यात उणीव राहिल्यामुळे त्याचे पुण्य पदरी पडत नाही. कर्म नसते तसेच प्राणिमात्राबद्दल अंत:करणात दयाही नसते. आणि फुकटचे रामनाम, तेही मनुष्याला मुखाने घेता येत नाही. (१००)

१०१

**जया नावडे नाम त्या येम जाची । विकल्पें उठे तर्क त्या नर्क ची ची ।**
**म्हणोनी अति आदरें नाम घ्यावें । मुखें बोलतां दोष जाती स्वभावें ॥**

ज्याला राम-नाम आवडत नाही, त्याला यमराज त्रास देतो. ज्या मनुष्याच्या मनात नामाबद्दल संशय निर्माण होतो आणि जो तर्क करीत बसतो त्याला नरकाचे दु:ख भोगावे लागते. म्हणून अत्यंत आदराने रामनाम घ्यावे. मुखाने नाम घेतले म्हणजे दोष नाहीसे होतात.(१०१)

१०२

**अती लीनता सर्वभावें स्वभावें । जना सज्ञनालागिं संतोषवावें ।**
**देहे कारणीं सर्व लावीत जावें । सगूणी अति आदरेंसी भजावें ॥**

अत्यंत नम्रपणे सर्वांशी वागावे. नम्रता पाहून संत-सज्ञनांना संतोष वाटतो. यासाठी देहाची सर्व शक्ती लावावी आणि अत्यंत आदराने सगुण रूपाची उपासना करावी.(१०२)

१०३

**हरीकीर्तनें प्रीति रामीं धरावी । देहेबुधि नीरूपणीं वीसरावी ।**
**परद्रव्य आणीक कांता परावी । येदर्थीं मना सांडि जीवीं करावी ॥**

भगवंताचे कीर्तन करताना रामाच्या प्रेमात रंगून जावे. भगवंताच्या निर्गुण स्वरूपाचे विवेचन करताना देहभान विसरून जावे. तसेच परद्रव्य व परस्त्री यांचा लोभ पूर्णपणे सोडून द्यावा.(१०३)

१०४

**क्रियेवीण नानापरी बोलिजेतें । परी चीत दुश्चीत तें लाजवीतें ।**
**मना कल्पना धीट सैराट धावे । तया मानवा देव कैसेनि पावे ॥**

मनुष्य लंब्या-चौड्या गप्पा मारतो, परंतु त्याप्रमाणे तो आपले आचरण करीत नाही. त्यामुळे त्याचे मन त्याला खाऊ लागते व तो आतून शरमिंदा होतो. प्रत्यक्ष आचरण होत नाही. मन कल्पना करण्यामध्ये सैरावैरा धावते, मग देवाचे दर्शन कसे घडणार?(१०४)

१०५

**विवेकें क्रिया आपुली पालटावी । अती आदरें शुध क्रिया धरावी ।**
**जनी बोलण्यासारिखें चाल बापा । मना कल्पना सोडि संसारतापा ॥**

मोठ्या विवेकाने सारासार विचार करून आपले आचरण सुधारावे. आणि आपली क्रिया शुद्ध ठेवावी. हे मना, जगामध्ये बोलण्याप्रमाणे वागावे. संसार दुःखमय आहे, तेव्हा कल्पना करीत बसण्याचे सोडून द्यावे.(१०५)

१०६

**बरी स्नानसंध्या करी येकनिष्ठा । विवेकें मना आवरी स्थानभ्रष्टा ।**
**दया सर्व भूती जया मानवाला । सदा प्रेमळू भक्तिभावें निवाला ॥**

मनुष्याने स्नानसंध्या इत्यादी शास्त्रविहित कर्मे एकनिष्ठेने करावीत. एकाग्र न होणाऱ्या, नको तिथे जाणाऱ्या मनास विवेकाने आवर घालावा. ज्या मनुष्यास प्राणीमात्राबद्दल दया असते आणि ज्याला परमेश्वराबद्दल भक्तिभाव असतो, त्यालाच समाधान मिळते.(१०६)

१०७

**मना कोपआरोपणा ते नसावी । मना बुधि हे साधुसंगी वसावी ।**
**मना नष्ट चांडाळ तो संग त्यागी । मना होई रे मोक्षमार्गी विभागी ॥**

हे मना, राग येऊ देऊ नकोस. संतांच्या संगतीमध्ये बुद्धी वसू दे. हे मना, दुष्ट व नीच माणसाची संगत टाळावी. अशा प्रकारे वागून तू मोक्षाचा भागीदार हो.(१०७)

१०८

**सदा सर्वदा सज्जनाचेनि योगें । क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागे ।**
**क्रियेवीण वाचाळता ते निवारी । तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥**

हे मना, सज्जन-साधू-संतांच्या संगतीमुळे आचरणामध्ये बदल घडतो व भगवंताची जाणीव होऊन त्याच्याबद्दल भक्ती वाढू लागते. स्वतः आचरण

केल्याशिवाय फुकटची बडबड करू नकोस. ज्यामुळे वाद-विवाद संपतो, ते संभाषण परमार्थाच्या दृष्टीने हितकारक असते.(१०८)

१०९

**जनीं वाद वेवाद सोडूनि द्यावा । जनी सूखसंवाद सूखें करावा ।**
**जगीं तो चि तो शोकसंतापहारी । तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥**

कुणाशीही वाद-विवाद करू नये. मात्र तात्त्विक प्रश्नाबद्दल व भगवंताबद्दल आनंद देणारे संभाषण अवश्य करावे. अशा संभाषणामुळे बुद्धीचे समाधान होऊन मनाचे क्लेश दूर होतात. असे संभाषण पारमार्थिक दृष्टीने हितकारक असते.(१०९)

११०

**तुटे वाद संवाद त्यातें म्हणावें । विवेकें अहंभाव यातें जिणावें ।**
**अहंतागुणे वाद नाना विकारी । तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥**

ज्या चर्चेमुळे वाद संपतो, त्याला संवाद असे म्हणतात. मनुष्याने आपल्या विवेकाने अहंकार जिंकावा. अहंकाराने वाद केला तर क्रोधादी विकार उत्पन्न होतात. ज्यामुळे वाद-विवाद संपतात ते संभाषण हितकारक असते.(११०)

१११

**हिताकारणें बोलणें सत्य आहे । हिताकारणें सर्व शोधूनि पाहें ।**
**हिताकारणें बंड पाषांड वारी । तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥**

हितासाठी खरे बोलणे गरजेचे असते. आपल्या कल्याणासाठी शास्त्र-ग्रंथांचा शोध घे. आपल्या हितासाठी भगवंताचा द्रोह करणे व दांभिकपणे वागणे या गोष्टी तू सोडून दे. ज्यामुळे वाद-विवाद संपतात ते संभाषण हितकारक असते. (१११)

११२

**जनीं सांगतां ऐकतां जन्म गेला । परी वाद वेवाद तैसा चि ठेला ।**
**उठे संशयो वाद हा दंभधारी । तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥**

तात्त्विक उपदेश करणारे जन्मभर सांगत राहिले आणि ऐकणारे ते ऐकत राहिले. परंतु तात्त्विक वाद-विवाद आहेत तसेच राहिले. दुर्जन माणसांच्या मनात नेहमी संशय येतो. त्यामुळे त्याचा दंभ वाढत राहतो. ज्या बोलण्यामुळे वाद संपतात ते बोलणे हितकारक होय.(११२)

११३

**जनीं हीत पंडित सांडीत गेले । अहंतागुणें ब्रह्मराक्षेस झाले ।**
**तयाहूंनि वित्पन्न तो कोण आहे । मना सर्व जाणीव सांडूनि राहे ॥**

मोठमोठे विद्वान अहंकारामुळे आत्मकल्याण साधू शकले नाहीत. त्यांच्यापेक्षा विद्वान कोण होते ? परंतु अहंकारामुळे ते शेवटी ब्रह्मराक्षस झाले म्हणून हे मना, विद्वत्तेची घमेंड सोडून दे.(११३)

११४

**फुकाचें मुखी बोलतां काय वेचे । दिसेंदीस अभ्यांतरी गर्व सांचे ।**
**क्रियेवीण वाचाळता वेर्थ आहे । विचारें तुझा तूंचि शोधून पाहें ॥**

फुकटची बडबड करण्यास काहीही लागत नाही. उलट त्यामुळे मनामध्ये दिवसेंदिवस घमेंड वाढू लागते. आचरणाशिवाय बडबड करणे व्यर्थ होय. हे खरे की खोटे, ते तूच शोधून बघ.(११४)

११५

**तुटे वाद संवाद तेथें करावा । विवेकें अहंभाव हा पालटावा ।**
**जनीं बोलण्यासारखें आचरावें । क्रियापालटें भक्तिपंथे चि जावें ॥**

जेथे वाद-विवाद संपण्याची शक्यता असेल तेथेच संभाषण करावे. विवेकाने अहंकार नाहीसा करण्याचा प्रयास करावा. बोलल्याप्रमाणे वागावे. भक्तीचा मार्ग मनुष्याचे आचरण बदलून टाकतो, म्हणून त्या मार्गाने जावे.(११५)

११६

**बहू श्रापितां कष्टला अंबऋषी । तयाचे स्वये श्रीहरी जन्म सोशी ।**
**दिल्हा क्षीरसिंधू तया ऊपमानी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥**

अंबरीष राजाला दुर्वास ऋषीच्या शापामुळे फार त्रास सोसावा लागला. त्यासाठी भगवंताला जन्म घ्यावा लागला. भगवंताने उपमन्यूला दूध पाहिजे होते म्हणून आपला क्षीरसागर त्याला बक्षीस देऊन टाकला. अर्थात भगवंत हा भक्तांचा कैवारी आहे. तो आपल्या भक्तांची उपेक्षा करीत नाही.(११६)

११७

**धुरुं लेकरूं बापुडें दैन्यवाणें । कृपा भाकिता दीधली भेटि जेणें ।**
**चिरंजीव तारांगणी प्रेमखाणी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥**

ध्रुव हा बिचारा लहान पोर होता. त्याने करुणा भाकली तेव्हा भगवंताने त्याला दर्शन दिले. त्याच्यावरील प्रेमामुळे भगवंताने ताऱ्यांनी भरलेल्या आकाशात त्याला अढळपद दिले. भगवंत हा भक्तांचा कैवारी आहे, तो आपल्या भक्तांची कधी उपेक्षा करीत नाही.(११७)

११८

**गजेंद्रू महां संकटीं वास पाहे । तयाकारणें श्रीहरी धांवताहे ।**

**उडी घातली जाहला जीवदानी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥**

गजेंद्रावर प्राणांवरचे संकट आले तेव्हा त्याच्यासाठी भगवंत धावत गेला. त्याने उडी मारून गजेंद्राचे प्राण वाचविले. अशा प्रकारे भगवंत हा भक्तांचा कैवारी आहे. तो आपल्या भक्तांची उपेक्षा करीत नाही.(११८)

११९

**अजामेळ पापी तया अंत आला । कृपाळूपणें तो जनीं मुक्त केला ।**
**अनाथासि आधार हा चक्रपाणी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥**

महापापी अजामिळाचा मृत्यू जेव्हा जवळ आला, तेव्हा नाम घेतल्यामुळे भगवंताने कृपा करून त्याचा उद्धार केला. भगवंत हा अनाथाला आधार देतो. तो भक्तांचा कैवारी आहे. तो भक्तांची उपेक्षा कधीही करीत नाही.(११८)

१२०

**विधीकारणें जाहला मछ वेगीं । धरी कूर्मरूपें धरा पुष्टिभागीं ।**
**जना रक्षणाकारणें नीच योनी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥**

ब्रह्मदेवासाठी भगवंताला माशाचे रूप घ्यावे लागले. कासवाचे रूप घेऊन त्याने पृथ्वीला आधार दिला. अशा प्रकारे लोकांच्या रक्षणासाठी भगवंताने क्षुद्र योनीत जन्म घेण्यास मागे-पुढे पाहिले नाही. तात्पर्य, भगवंत हा भक्तांचा कैवारी आहे व तो भक्तांची उपेक्षा कधीही करीत नाही.(१२०)

१२१

**महां भक्त प्रह्लाद हा कष्टवीला । म्हणोनी तयाकारणें सिंह्य झाला ।**
**न ये ज्वाळ वीषाळ संन्नीध कोण्ही । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥**

प्रह्लाद हा मोठा भक्त होता. हिरण्यकशिपूने त्याचा छळ मांडला, तेव्हा त्याच्यासाठी भगवंत हा सिंह बनला. त्याच्या अंगातून त्या वेळी प्रचंड ज्वाळा निघत होत्या. त्याच्याजवळ कोणीही जाऊ शकत नव्हते. भगवंत हा भक्तांचा कैवारी आहे. तो आपल्या भक्ताची उपेक्षा कधीही करीत नाही.(१२१)

१२२

**कृपा भाकितां जाहला वज्रपाणी । तयाकारणें वामनु चक्रपाणी ।**
**द्विजाकारणें भार्गव चापपाणी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥**

इंद्राने जेव्हा विनवणी केली तेव्हा भगवंताने त्याच्यासाठी वामनाचा अवतार घेतला. ब्राह्मणांच्यासाठी भगवंताने परशुराम बनून धनुष्य धारण केले . अशा प्रकारे भगवंत हा भक्तांचा कैवारी आहे. तो त्यांची उपेक्षा करीत नाही.(१२२)

१२३

अहिले सतीलागि आरण्यपंथे । कुढावा पुढें देव बंदी तयातें ।
बळें सोडितां घाव घाली निशाणी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥

भगवंताने साध्वी अहल्येसाठी अरण्यात जाऊन तिचा उद्धार केला. रावणाने देवांना बंदीवासात टाकले होते, त्यांना भगवंताने सोडविले. त्यासाठी त्याला निकराचे युद्ध करावे लागले, तेव्हा भगवंत हा भक्तांचा कैवारी आहे, तो भक्तांची उपेक्षा करीत नाही.(१२३)

१२४

तये द्रुपदीकारणें लागवेगें । त्वरें धांवतु सर्व सांडूनि मागें ।
कळीलागि जाला जसें बोध्य मौनी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥

द्रौपदीसाठी भगवंत सर्व काही सोडून लगेच धावत सुटला आणि त्याने तिची लाज राखली. या कलियुगात त्याने बुद्ध बनून मौन धारण केले आहे. तात्पर्य, तो भक्तांचा कैवारी असून भक्तांची कधीही उपेक्षा करीत नाही.(१२४)

१२५

अनाथां दिनाकारणें जन्मताहे । कलंकी पुढें देव होणार आहे ।
जया वर्णिता सीणली वेदवाणी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥

अनाथ व दीन-दुबळ्यांचेसाठी भगवंत जन्म घेतो. यापुढे कल्की रूपाने तो अवतार घेणार आहे. ज्याचे वर्णन करताना वादही कुंठित होऊन जातात तो देव भक्तांचा कैवारी आहे. तो त्यांची उपेक्षा करीत नाही.(१२५)

१२६

जनाकारणें देव लीळावतारी । बहूतांपरी आदरें वेषधारी ।
तया नेणती ते जन पापरूपी । दुरात्मे महां नष्ट चांडाळ पापी ॥

भक्तजनांचेसाठी भगवंत हा अवतार घेऊन लीला करतो. भक्तांच्या प्रेमासाठी तो नाना देह व नाना वेश धारण करतो. त्या भगवंताला जे ओळखत नाहीत ते पापी, हीन, अत्यंत वाईट व चांडाळ होत.(१२६)

१२७

जगीं धन्य तो रामसूखें निवाला । कथा ऐकतां सर्व तल्लीन जाला ।
देहेभावना रामबोधें उडाली । मनोवासना रामरूपी बुडाली ॥

जो मनुष्य भगवंताच्या कथा ऐकताना तल्लीन होऊन जातो, त्या आनंदामध्ये ज्याला समाधान मिळते, तो या जगात धन्य होय. भगवंताच्या ज्ञानामुळे त्याची देहबुद्धी नाहीशी होते आणि त्याच्या अंत:करणातील सर्व वासना रामाच्या

स्वरूपात विलीन होऊन जातात.(१२७)

१२८

**मना वासना वासुदेवीं वसों दे । मना कामना कामसंगी नसों दे ।**
**मना कल्पना वाउगी ते न कीजे । मना सज्जना सज्जनी वस्ति कीजे ॥**

हे मना, तुझ्या वासना भगवंताच्या ठायी राहू देत. मात्र काम-वासना बाळगू नकोस. हे मना, अवास्तव कल्पना करीत राहू नकोस. यासाठी तू संतांचा सहवास धर.(१२८)

१२९

**गतीकारणें संगती सज्जनाची । मती पालटे सूमती दुर्जनाची ।**
**रतीनायिकेचा पती नष्ट आहे । म्हणोनी मनातीत होऊनी राहे ॥**

संतांच्या सहवासाने दुष्ट माणसाची बुद्धी पालटून त्याला चांगली बुद्धी लाभते. म्हणून जर तुला उत्तम गती पाहिजे असेल तर संतांची संगत धर. रतीचा पती कामदेव हा फार वाईट आहे. म्हणून काम-वासनेमागे लागू नकोस. हे साध्य करण्यासाठी तू संतांचा सहवास धर.(१२९)

१३०

**मना अल्प संकल्प तो ही नसावा । सदा सत्य संकल्प चित्तीं वसावा ।**
**जननीं जल्प वीकल्प तो ही तजावा । रमाकांत येकांतकाळी भजावा ॥**

हे मना, हीन संकल्प धरू नकोस. नेहमी सत्य संकल्प बाळगावा. वायफळ बडबड करू नये. एकांत वेळी भगवंतांचे चिंतन-भजन करावे.(१३०)

१३१

**भजाया जनीं पाहतां राम येकु । करी बाण ऐकु मुखीं शब्द येकु ।**
**क्रिया पाहतां उधरे सर्व लोकू । धरा जानकीनायकाचा विवेकु ॥**

प्रभू राम हा एकबाणी व एकवचनी आहे. भक्ती करण्यास त्याच्यासारखा देव नाही. त्याचे चरित्र अवलोकन केल्यास सर्वांचा उद्धार होतो, अशा त्या जानकीनायक रामाचा आदर्श बाळगून वागावे.(१३१)

१३२

**विचारूनि बोले विवंचूनि चाले । तयाचेनि संतप्त ते ही निवाले ।**
**बरें शोधिल्यावीण बोलों नको हो । जनीं बोलणें शुध नेमस्त राहो ॥**

जो मनुष्य नेहमी विचारपूर्वक बोलतो आणि विचारपूर्वक वागतो, त्या मनुष्याच्या सहवासाने त्रितापाने त्रस्त झालेले लोकही संतुष्ट होतात. म्हणून सर्व तऱ्हेने विचार करून शोध घेतल्याशिवाय बोलू नये. आणि आपले वागणे नेहमी शुद्ध

व शिस्तीचे असावे.(१३२)

१३३

**हरीभक्त वीरक्त विज्ञानरासी । जेणें मानसीं स्थापिलें निश्चयासी ।**
**तया दर्शनें स्पर्शनें पुण्य जोडे । तया भाषणें नष्ट संदेह मोडे ॥**

जो भगवंताची उत्कट भक्ती करतो, जो वैराग्य-संपन्न आहे आणि ज्याला पारमार्थिक अनुभव लाभला आहे, अशा सत्पुरुषाच्या दर्शनामुळे व त्याचा स्पर्श झाल्यामुळे मोठे पुण्य प्राप्त होते. त्या संत पुरुषाच्या वचनांमुळे मनातील संशय नष्ट होतात.(१३३)

१३४

**नसे गर्व आंगी सदा वीतरागी । क्षमा शांति भोगी दयादक्ष योगी ।**
**नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा । यहीं लक्षणीं जाणिजे योगिराणा ॥**

ज्याच्या अंगी गर्व नसतो, जो नित्य वैराग्य-संपन्न असतो, जो क्षमाशील असतो, ज्याचे मन शांत असते, असा दयाळू योगी जो असतो, त्याला कधी लोभ होत नाही. तसेच क्षोभही होत नाही. तो कधीही दीनवाणा नसतो. ही सर्व लक्षणे योग्यांच्या राजाची आहेत, असे समजावे.(१३४)

१३५

**धरी रे मना संगती सज्जनाची । जेणें वृत्ति हे पालटे दुर्जनाची ।**
**बळें भाव सद्बुधि सन्मार्ग लागे । महां क्रूर तो काळ विक्राळ भंगे ॥**

हे मना, संतांची संगत धर. अशा संगतीमुळे दुष्ट मनुष्याची वृत्तीसुद्धा पालटते. सत्संगतीमुळे सद्भाव, सद्बुद्धी व सन्मार्ग लाभतो. मग महाभयंकर व महाक्रूर अशा मृत्यूचे भय उरत नाही.(१३५)

१३६

**भयें व्यापिलें सर्व ब्रह्मांड आहे । भयातीत ते संत आनंत पाहें ।**
**जया पाहतां द्वैत कांही दिसेना । भय मानसीं सर्वथा ही असेना ॥**

संपूर्ण विश्व हे भयाने ग्रासले आहे. मात्र संत हे भयाच्या पलीकडे असतात. त्यांना अनंत अशा भगवंतांचे दर्शन झाल्यावर द्वैत काही दिसतच नाही. त्यामुळे मनामध्ये भय उरत नाही.(१३६)

१३७

**जिवां श्रेष्ठ ते स्पष्ट सांगोनि गेले । परी जीव अज्ञान तैसेचि ठेले ।**
**देहबुधिचें कर्म खोटें टळेना । जुनें ठेवणें मीपणें आकळेना ॥**

संत-महात्म्यांनी अज्ञानी जीवांच्यासाठी ज्ञानाचा विचार स्पष्टपणे सांगू

ठेवला आहे. परंतु जीवांचे अज्ञान तसेच राहिले आहे. देहबुद्धीमुळे खोटी कर्मे त्यांच्या हातून घडतच राहतात. अहंकारामुळे त्यांना सनातन असे आत्मज्ञान कळत नाही.(१३७)

१३८

**भ्रमें नाडळे वित्त ते गुप्त जालें । जिवा जन्मदारिद्र टाकूनि आलें ।**
**देहेबुधि निश्चयो ज्या टळेना । जुनें ठेवणें मीपणें आकळेना ॥**

आपल्याजवळ असलेले आत्मधन जीवाला भ्रांतीमुळे सापडत नाही. यामुळे जन्मभर त्याच्यासमोर दारिद्रय उभे असते. देहबुद्धी त्याच्या मनात पक्की बसलेली असते. त्यामुळे त्याला सनातन असे आत्मज्ञान उमगत नाही.(१३८)

१३९

**पुढें पाहतां सर्व ही कोंदलेंसे । अभाग्यास हें दृश्य पाषाण भासे ।**
**अभावें कदा पुण्य गांठी पडेना । जुनें ठेवणें मीपणें आकळेना ॥**

माणसाने डोळे उघडून पाहिले तर त्याला भगवंतच सर्वत्र भरून राहिला आहे, असे दिसेल. पण दुर्दैवी माणसाला समोर निर्जीव दगड-धोंडे दिसतात. भगवंताच्या अस्तित्त्वाची जाणीव नसल्याने त्याला पुण्य-संचयही घडत नाही. त्यामुळे त्याला शाश्वत अशा आत्मस्वरूपाची जाणीव होत नाही.(१३९)

१४०

**जयाचें तया चुकलें प्राप्त नाहीं । गुणें गोविलें जाहलें दुख देहीं ।**
**गुणावेगळी वृत्ति ते ही वळेना । जुनें ठेवणें मीपणें आकळेना ॥**

आत्मस्वरूप हे प्रत्येकाच्या मालकीचे आहे. ते हरवल्यामुळे सापडत नाही. जीव सत्त्व, रज, तम या त्रिगुणांत सापडल्यामुळे मनुष्याला देहाचे दु:ख भोगावे लागते. त्याची मनोवृत्ती गुणांपासून वेगळी होऊ शकत नाही. म्हणून त्याच्याजवळ असलेल्या शाश्वत आत्मस्वरूपाचा ठेवा त्याला माहित नसतो.(१४०)

१४१

**म्हणे दास सायास त्याचे करावे । जनीं जाणता पाय त्याचे धरावे ।**
**गुरुअंजनेंवीण ते आकळेना । जुनें ठेवणें मीपणें ते कळेना ॥**

श्रीसमर्थ रामदास म्हणतात की आत्मज्ञानी पुरुष शोधून त्याला शरण जावे. गुरुने दृष्टी दिल्याशिवाय आत्मज्ञान होत नाही, म्हणून मनुष्यास त्याच्याजवळ असलेला शाश्वत आत्मस्वरूपाचा ठेवा समजून येत नाही.(१४१)

१४२

**कळेना कळेना कळेना ढळेना । ढळे नाढळे संशयो ही ढळेना ।**
**गळेना गळेना अहंता गळेना । बळें आकळेना मिळेना मिळेना ॥**

काहीही केल्या मनातला संशय दूर होत नाही. काही केल्या मनातील अहंभाव गळून पडत नाही. आत्मज्ञान हे जबरदस्तीने कळतही नाही व मिळतही नाही.(१४२)

१४३

**अविद्यागुणें मानवा ऊमजेना । भ्रमें चूकलें हीत तें आकळेना ।**
**परीक्षेविणें बांधलें दृढ नाणें । परी सत्य मिथ्या असें कोण जाणें ॥**

अविद्या असल्यामुळे मनुष्याला सत्य काय ते कळत नाही. मायेमुळे तो भ्रमात सापडतो. त्याला आपले हित कशात आहे ते कळत नाही. पारख न करता गाठीला नाणे बांधले तर ते खरे आहे की खोटे, हे कोण सांगणार? (१४३)

१४४

**जगीं पाहतां साच तें काय आहे । अती आदरें सत्य शोधूनि पाहें ।**
**पुढें पाहतां पाहतां देव जोडे । भ्रमें भ्रांति अज्ञान हें सर्व मोडे ॥**

जगामध्ये सत्य काय आहे याचा मनापासून शोध घ्यावा. असा शोध घेत गेल्यास मग देव भेटतो. आणि मग भ्रम, भ्रांती, अज्ञान अशा गोष्टी नष्ट होतात.(१४४)

१४५

**सदा वीषयो चिंततों जीव जाला । अहंभाव अज्ञान जन्मासि आला ।**
**विवेकें सदा स्वस्वरूपी भरावें । जिवा ऊमगीं जन्म नाहीं स्वभावें ॥**

सतत विषयांचाच विचार केल्याने जीवदशा प्राप्त होते. त्यामुळे अहंभाव आणि अज्ञान उत्पन्न होते. जन्म-मरणाच्या पलीकडे जाण्यासाठी मोठ्या विवेकाने स्वस्वरूपामध्ये मग्न व्हावे. जीवाचे जे उगम स्थान आहे, त्या आत्मस्वरूपामध्ये मग्न झाल्यावर जन्म-मरणाचा संबंध उरत नाही.(१४५)

१४६

**दिसे लोचनीं ते नसे कल्पकोडी । अकस्मात आकारलें काम मोडी ।**
**पुढें सर्व जाईल कांही न राहे । मना संत आनंत शोधूनि पाहे ॥**

हे मना, डोळ्यांना जे दिसत आहे व इंद्रियांना जे जाणवत आहे ते कल्पानुकल्पे राहणारे नाही. आकारास आलेल्या सर्व वस्तूंना काळ हा नष्ट करून टाकतो. प्रलयकाळी सर्व नष्ट होणार आहे. काहीही उरणार नाही. म्हणून हे मना, जे शाश्वत आहे त्याचा शोध घे.(१४६)

१४७

**फुटेना तुटेना चळेना ढळेना । सदा संचलें मीपणें तें कळेना ।**
**तया एकरूपासि दूजें न साहे । मना संत आनंत शोधूनि पाहे ॥**

आत्मवस्तू ही कधी फुटत नाही, कधी तुटत नाही, ढळत नाही व विचलित होत नाही. पण मनात अहंकार साठल्यामुळे ती कळत नाही. ती एकमेव वस्तू आहे. तेथे द्वैतभाव सहन होत नाही. म्हणून जे शाश्वत आहे, त्याचा शोध घे.(१४७)

१४८

**निराकार आधार ब्रह्मादिकांचा । जया सांगता सीणली वेदवाचा ।**
**विवेकें तदाकार होऊनि राहें । मना संत आनंत शोधूनि पाहें ॥**

ते परमतत्त्व निराकार आहे, परंतु तेच ब्रह्मदेवादी देवांचे अधिष्ठान आहे. त्याचे वर्णन करताना वेदही थकून जातात. म्हणून हे मना, जे शाश्वत आहे, त्या परमतत्त्वाचा शोध घे.(१४८)

१४९

**जगीं पाहतां चर्मचक्षीं न लक्षे । जगीं पाहतां ज्ञानचक्षीं न रक्षे ।**
**जगीं पाहतां पाहणें जात आहे । मना संत आनंत शोधूनि पाहें ॥**

परब्रह्म ही वस्तू डोळ्यांनी दिसत नाही. ज्ञानचक्षूंनीच ती पाहता येते. ज्ञानचक्षूंनी पाहात असता ते पाहणे हेही लोप पावते आणि परब्रह्माशिवाय काहीच उरत नाही. हे मना, अनंत असलेल्या त्या परब्रह्माचा शोध घे.(१४९) .

१५०

**नसे पीत ना श्वेत ना शाम कांहीं । नसे वेक्त आवेक्त ना नीळ नाहीं ।**
**म्हणे दास विश्वासतां मुक्ति लाहे । मना संत आनंत शोधूनि पाहें ॥**

परब्रह्म हे पिवळे नाही, पांढरे नाही, श्यामल नाही. ते व्यक्त नाही की अव्यक्तही नाही. ते निळेही नाही. संतांच्या वचनांवर विश्वास ठेवल्यास त्या परब्रह्म-तत्त्वाचे दर्शन घडते व मुक्ती मिळते. हे मना, त्या अनंत अशा तत्त्वाचा शोध घे.(१५०)

१५१

**खरें शोधितां शोधितां शोधताहे । मना बोधितां बोधितां बोधताहे ।**
**परी सर्वही सज्जनाचेनि योगें । बरा निश्चयो पाविजे सानुरागें ॥**

परम सत्याचा शोध चिकाटीने घेतला तर लागू शकतो. मनाला वारंवार समजाविले तर त्याला समजते. पण हे सर्व संतांच्या संगतीने घडून येते. दृढ निश्चयामुळे व प्रेमामुळे ते प्राप्त होते.(१५१)

१५२

**बहूतां परी कूसरी तत्वझाडा । परी पाहिजे अंतरी तो निवाडा ।**
**मना सार साचार तें वेगळें रे । समस्तांमध्यें येक ते आगळें रे ॥**

अनेक विचारवंतांनी मोठ्या कौशल्याने तत्त्वज्ञानाचे विवेचन केले आहे. परंतु स्वत:च्या बुद्धीने त्याचा निर्णय घेतला पाहिजे. तत्त्वज्ञानाचे सार असणारे सत्य म्हणजे परब्रह्म हे वेगळेच आहे. ते सर्वांच्या ठायी असून पुन्हा आगळे-वेगळे आहे.(१५२)

१५३

**नव्हें पिंडज्ञानें नव्हे तत्वज्ञानें । समाधान कांही नव्हे तानमानें ।**
**नव्हे योगयागें नव्हे भोगत्यागें । समाधान ते सज्जनाचेनि योगें ॥**

शरीराचे ज्ञान करून घेतल्यामुळे किंवा तत्त्वज्ञान समजावून घेतल्यामुळे किंवा संगीतादी ललित कलांमुळे किंवा योगाभ्यासामुळे किंवा यज्ञामुळे किंवा भोगांचा त्याग केल्यामुळे जे समाधान लाभत नाही ते समाधान संतांच्या संगतीमुळे मिळते.(१५३)

१५४

**महांवाक्य तत्वादिकें पंचीकर्णें । खुणें पाविजे संतसंगे विवर्णें ।**
**द्वितीयेसि संकेत जो दाविजेतो । तया सांडुनी चंद्रमा भाविजेतो ॥**

'प्रज्ञानं ब्रह्मं', 'अहं ब्रह्मासि', 'तत्त्वमसि', 'अयमात्मा ब्रह्म' ही वेदांतील महावाक्ये यांचा अर्थ, सृष्टिरचनेची मूळतत्त्वे व पंचमहाभूतांपासून होणारी विश्वरचना या गोष्टींचे विवेचन संतांच्या तोंडून ऐकावे. मग ते त्या परब्रह्माची खूण दाखवून देतात. ज्याप्रमाणे द्वितीयेचा चंद्र दाखविण्यासाठी एखाद्या झाडाच्या फांदीच्या खूणेने दाखवितात, चंद्र दिसला की खूण बाजूला सारतात, त्याप्रमाणे संत हे परब्रह्माची खूण दाखवतात.(१५४)

१५५

**दिसेना जनीं तेंचि शोधूनि पाहें । बरें पाहतां गूज तेथें चि आहे ।**
**करीं घेऊन जातां कदा आडळेना । जनीं सर्व कोंदाटलें तें कळेना ॥**

जगामध्ये इंद्रियांनी जे परम तत्त्व दिसत नाही, तेच शोधावे. नीटपणे पाहिले की ते खरे रहस्य दिसते. ती वस्तू हातात घेऊन पाहता येत नाही. ते ब्रह्म सर्वत्र भरून राहिले आहे हे लक्षात येत नाही.(१५५)

१५६

**म्हणे जाणता तो जनीं मूर्ख पाहें । अतर्कासि तर्की असा कोण आहे ।**

**जनीं मीपणें पाहतां पाहवेना । तया लक्षितां वेगळें राहवेना ॥**

मला परब्रह्माचे ज्ञान झाले आहे, असे जो म्हणतो, तो मूर्ख होय. ती वस्तू अतर्क्य आहे, तेव्हा तर्काने ती जाणता येत नाही. मीपण असताना ते परब्रह्म पाहता येत नाही. एकदा मीपणा सोडून पाहिले की मग परब्रह्माहून वेगळे असे काही उरत नाही.(१५६)

१५७

**बहू शास्त्र धुंडाळितां वाड आहे । जया निश्चयो येक तो ही न साहे ।**
**मती भांडती शास्त्रबोधे विरोधें । गती खुंटती ज्ञानबोधें प्रबोधें ॥**

ज्ञानशाखांचा पसारा मोठा आहे. त्यांमध्ये एकमत नाही. निरनिराळ्या मतांचे लोक परस्पर भांडत असतात. परंतु ज्ञान झाल्यामुळे जो जागा झाला आहे, त्याला परमात्म्याचे ज्ञान मिळते आणि त्याची बुद्धी गुंग होते.(१५७)

१५८

**श्रुति न्याय मीमांसकें तर्कशास्त्रें । स्मृति वेद वेदान्तवाक्यें विचित्रें ।**
**स्वयें शेष मौनावला स्थीर पाहे । मना सर्व जाणीव सांडून राहे ॥**

चार वेद, न्यायदर्शन, मीमांसा, तर्कशास्त्र, अनेक स्मृति-पुराणे, वेदांत ग्रंथ इ. सर्व त्या परमात्म्याचे वर्णन करतात, परंतु शेवटी 'नेति नेति' असे म्हणतात. स्वतः शेषनाग सहस्रावधी मुखे असूनही त्या परमात्म्याचे वर्णन करता येत नसल्यामुळे मौन झालेला आहे. तेव्हा ज्ञानाचा अहंकार सोडून ती वस्तू पाहण्याचा प्रयत्न कर.(१५८)

१५९

**जेणें मक्षिका भक्षिली जाणिवेची । तया भोजनाची रुची प्राप्ति कैंची ।**
**अहंभाव ज्या मानसींचा विरेना । तया ज्ञान हें अन्न पोटीं जिरेना ॥**

आत्मज्ञानाच्या भोजनात अहंभावाची माशी पोटात गेल्यास ती ज्ञान पचू देत नाही. अहंभावामुळे ज्ञानाची आवड नाहीशी होते व मळमळ उरते. ज्याच्या मनातील अहंभाव नाहीसा होत नाही, त्याला ज्ञान पचत नाही.(१५९)

१६०

**नको रे मना वाद हा खेदकारी । नको रे मना भेद नाना विकारी ।**
**नको रे मना सीकऊं पूढिलांसि । अहंभाव जो राहिला तूजपासीं ॥**

हे मना, वादावादी करणे हे अत्यंत वाईट आहे. वादातील वायफळ चर्चा माणसांमध्ये भेद निर्माण करते व नाना प्रकारचे विकार निर्माण करते. तेव्हा तुझ्याजवळ जो अहंभाव आहे तो इतरांना शिकवू नकोस.(१६०)

१६१

**अहंतागुणे सर्व ही दु:ख होतें । मुखें बोलिलें ज्ञान ते व्यर्थ जातें ।**
**सुखी राहतां सर्व ही सूख आहे । अहंता तुझी तूं चि शोधूनि पाहें ॥**

अहंकारामुळेच सर्व दु:खे निर्माण होतात. या अहंकारामुळेच मुखातून बाहेर पडणारा ज्ञानाचा उपदेश वाया जातो. त्याचा काही परिणाम होत नाही. आपला अहंकार कशात आहे, हे तुझे तूच शोधून काढ आणि तो नष्ट कर, म्हणजे तुला सुखच अनुभवाला मिळेल.(१६१)

१६२

**अहंतागुणे नीती सांडी विवेकी । अनीतीबळें श्लाघ्यता सर्व लोकीं ।**
**परी अंतरी सर्व ही साक्ष येते । प्रमाणांतरे बुद्धि सांडूनि जाते ॥**

अहंकारामुळे विवेकी माणसेसुद्धा नीती सोडून अनीतीने वागू लागतात व पुढे येतात. लोक त्यांची प्रशंसा करू लागतात. परंतु त्यांचे मन खात असते. त्यांची बुद्धी शास्त्रांचा विचार सोडून अनीतीच्या मार्गाने जाऊ लागते.(१६२)

१६३

**देहेबुधिचा निश्चयो दृढ जाला । देहातीत तें हीत सांडीत गेला ।**
**देहेबुधि ते आत्मबुधी करावी । सदा संगती सज्जनाची धरावी ॥**

अज्ञानामुळे देह म्हणजेच मी अशी दृढ जाणीव झाली की माणूस स्वत:चे हित साध्य करू शकत नाही व सर्व गमावून बसतो. म्हणून मी म्हणजे देह अशी जाणीव सोडून तिला मी म्हणजे आत्मा असे रूप द्यावे. त्यासाठी नेहमी संतांची संगती धरावी.(१६३).

१६४

**मनें कल्पिला वीषयो सोडवावा । मनें देव निर्गूण तो वोळखावा ।**
**मनें कल्पितां कल्पना ते सरावी । सदा संगती सज्जनाची धरावी ॥**

मन हे कल्पनेने विषयात गुरफटून जाते म्हणून याला काल्पनिक विषयातून मोकळे करावे आणि त्रिगुणातीत असा जो निर्गुण परमात्मा आहे तो जाणून घ्यावा. कल्पनेतून असंख्य कल्पना करीत त्यात मन गुरफटून राहते. तेव्हा कल्पना करणे सोडून द्यावे. त्यासाठी नेहमी संतांची संगती धरावी.(१६४)

१६५

**देहादीक प्रपंच हा चिंतियेला । परी अंतरी लोभ निश्चीत ठेला ।**
**हरीचिंतने मुक्तिकांता वरावी । सदा संगती सज्जनाची धरावी ॥**

मनुष्य हा आपल्या देहाचा व प्रपंचाचाच विचार करीत असतो. त्यामुळे

मनात प्रपंचाची आसक्ती निर्माण होते म्हणून मनुष्याने भगवंताच्या विचाराशी आपले नाते जोडावे, म्हणजे मुक्ती मिळेल. त्यासाठी नेहमी संतांची संगत धरावी.(१६५)

१६६

**अहंकार विस्तारला या देह्याचा । स्त्रियापुत्रमित्रादिकें मोह त्यांचा ।**
**बळें भ्रांति हे जन्मचिंता हरावी । सदा संगती सज्ञनाची धरावी ॥**

देहाचा अहंकार वाढला म्हणजे स्त्री, पुत्र, मित्र, स्वकीय यांच्या मोहात मन गुंतून पडते. म्हणून दृढ निश्चयाने हे अज्ञान दूर करावे. अभ्यासाने अज्ञान दूर केले म्हणजे पुन्हा पुन्हा जन्म होण्याची चिंता दूर होईल. त्यासाठी संतांची संगत धरावी.(१६६)

१६७

**बरा निश्चयो शाश्वताचा करावा । म्हणे दास संदेह तो वीसरावा ।**
**घडीनें घडी सार्थकाची करावी । सदा संगती सज्जनाची धरावी ॥**

शाश्वत सत्य शोधण्याचा चांगला निश्चय करावा. मनातील सर्व संशय दूर सारावे आणि जीवनातील प्रत्येक क्षण सार्थकी लावावा. त्यासाठी नेहमी संतांची संगत धरावी.(१६७)

१६८

**करी वृत्ति जो संत तो संत जाणा । दुराशागुणे जो नव्हे दैन्यवाणा ।**
**उपाधी देहेबुधितें वाढवीते । परी सज्ञना केवि बाधूं शके ते ॥**

जो आत्मस्वरूपावर वृत्ती स्थिर करतो तो संत आहे, असे समजावे. त्याच्या मनात भगवंतावाचून कोणतीही वासना नसते. त्यामुळे त्याला दैन्य नसते. तो आत्मानंदात मग्न असतो. प्रपंचातील उपाधी देहबुद्धी वाढविण्यास कारण होते, परंतु ती संतांना बाधत नाही.(१६८)

१६९

**नसे अंत आनंत संता पुसावा । अहंकार विस्तार हा नीरसावा ।**
**गुणेंवीण निर्गूण तो आठवावा । देहेबुधिचा आठऊं नाठवावा ॥**

ज्याला अंत नाही अशा अनंत परमेश्वराचे स्वरूप काय आहे, ते संतांना विचारून घ्यावे. गुणरहित असलेल्या निर्गुण स्वरूपाचे स्मरण ठेवावे. देहबुद्धीचे स्मरण होऊ देऊ नये.(१६९)

१७०

**देहबुधि हे ज्ञानबोधें तजावी । विवेकें तये वस्तुची भेटि घ्यावी ।**
**तदाकार हे वृत्ति नाहीं स्वभावें । म्हणोनी सदा तें चि शोधीत जावें ॥**

आत्मस्वरूपाचे ज्ञान करून घेऊन प्रयत्नाने देहबुद्धी नाहीशी करावी. विवेकपूर्वक प्रयत्न करून आत्म्याचा साक्षात्कार करून घ्यावा. आपली वृत्ती सहजासहजी आत्म्याशी तद्रूप होत नाही, म्हणून आत्म्याचा शोध घेत राहावा.(१७०)

१७१

**असे सार साचार तें चोरलेंसे । येहीं लोचनीं पाहतां दृश्य भासे ।**
**निराभास निर्गूण तें आकळेना । अहंतागुणें कल्पितां ही कळेना ॥**

संपूर्ण विश्वाचे सार असलेले व सत्य असलेले परब्रह्म हे गुप्त असते. ते दृष्टीला दिसत नाही. डोळ्यांना जे दिसते तो भास आहे, सत्यस्वरूप नव्हे. माणसाला अहंकार असल्यामुळे कितीही कल्पना केली तरी आभासरहित व त्रिगुणातीत असलेल्या परमात्म्याचे स्वरूप जाणणे शक्य होत नाही.(१७१)

१७२

**स्फुरे वीषयीं कल्पना ते अविद्या । स्फुरे ब्रह्म रे जाण माया सुविद्या ।**
**मुळीं कल्पना दो रूपें ते चि जाली । विवेकें तरी सस्वरूपीं मिळाली ॥**

विषयांविषयी जी कल्पना स्फुरण पावते, ते अज्ञान होय आणि परब्रह्माविषयी जी कल्पना स्फुरण पावते, ते ज्ञान होय. मुळची एकच कल्पना दोन रूपांत स्फुरण पावते. विवेक धरल्यास ती आत्मस्वरूपामध्ये रमत असते.(१७२)

१७३

**स्वरूपी उदेला अहंकार राहो । तेणें सर्व आछ्यादिले व्योम पाहों ।**
**दिशा पाहतां ते निशा वाढताहे । विवेकें विचारे विवंचूनि पाहे ॥**

मूळ परमात्म्याच्या स्वरूपात अहंकार उदय पावला. त्यामुळे आकाशासारखे अनंत असणारे स्वरूप झाकळून गेले. जिकडे पाहावे तिकडे अज्ञानाचा अंधार भरून राहिला आहे म्हणून विवेक धारण करून आत्म-स्वरूपाचा शोध घ्यावा.(१७३)

१७४

**जया चक्षुनें लक्षितां लक्षवेना । भवा भक्षितां रक्षितां रक्षवेना ।**
**क्षयातीत तो आक्षै मोक्ष देतो । दयादक्ष तो साक्षिने पक्ष घेतो ॥**

चर्मचक्षूंनी परमात्म्याचे दर्शन होत नाही. ज्ञानचक्षूंनी त्याचे दर्शन झाले की सर्व दृश्य जगताची काहीच सत्ता नसल्याचे कळून येते व तो अक्षय मोक्ष देतो. तो

मोठा दयाळू आहे. साक्षीपणाने तो भक्तांचा कैवार घेतो.(१७४)

१७५

**विधी निर्मिता लीहितो सर्व भाळी । परी लिहिता कोण त्याचे कपाळीं ।**
**हरु जाळितो लोक संव्हारकाळीं । परी सेवटी शंकरा कोण जाळी ॥**

ब्रह्मदेव सर्व प्राण्यांना उत्पन्न करतो, तेव्हा तो त्यांच्या कपाळी त्यांचें भविष्य लिहितो. पण ब्रह्मदेवाच्या कपाळी त्याचे भविष्य कोण लिहितो? शिवशंकर संहार-काळी सर्वांना जाळून टाकतो. पण शेवटी त्या शंकराला कोण बरे जाळून टाकतो?(१७५)

१७६

**जगीं द्वादशादीत्य हे रुद्र आक्रा । असंख्यात संख्या करी कोण शक्रा ।**
**जगीं देव धुंडाळितां आडळेना । जगीं मुख्य तो कोण कैसा कळेना ॥**

जगामध्ये बारा आदित्य आणि अकरा रुद्र आहेत. इंद्र इतके आहेत की ते मोजता येत नाहीत. जगामध्ये मुख्य देव कोण आहे ते शोधूनही दिसत नाही. तो कोण आहे व कसा आहे, हे काही समजत नाही.(१७६)

१७७

**तुटेना फुटेना कदा देवराणा । चळेना ढळेना कदा दैन्यवाणा ।**
**कळेना कळेना कदा लोचनासी । वसेना दिसेना जनीं मीपणासी ॥**

भगवंत हा कधी तुटत नाही, किंवा फुटत नाही. तो अस्थिर होत नाही किंवा आपल्या स्थानापासून ढळत नाही. त्याला कधीही दैन्य येत नाही. मनुष्यास तो चर्मचक्षूंनी दिसत नाही. अहंभावामुळे तो दिसत नाही किंवा त्याचे अस्तित्वही कळत नाही.(१७७)

१७८

**जया मानला देव तो पूजिताहे । परी देव शोधूनि कोण्ही न पाहे ।**
**जगीं पाहतां देव कोट्यानकोटी । जया मानसीं भक्ति जे तेचि मोठी ॥**

मनुष्य ज्याला देव मानतो, त्याची पूजा-अर्चा करीत बसतो, पण खरा देव कोणता आहे हे कोणी शोधून पाहात नाही. जगामध्ये कोट्यावधी देव-देवता आहेत. ज्याला ज्या देवाची भक्ती आवडते त्याला तो श्रेष्ठ समजतो. खरा देव शोधण्याची कोणी तसदी घेत नाही.(१७८)

१७९

**तिन्ही लोक जेथूनि निर्माण जाले । तया देवरायासि कोण्ही न बोले ।**

जगीं थोरला देव तो चोरलासे । गुरुवीण तो सर्वथा ही न दीसे ॥

ज्या ईश्वरापासून त्रैलोक्य निर्माण झाले, त्या ईश्वराला कोणी विचारत नाही, त्याचा शोध घेण्याची कोणी तसदी घेत नाही. हा जो परमेश्वर आहे तो सूक्ष्म असल्यामुळे गुप्त आहे. गुरुकृपेशिवाय तो कधीही दिसणार नाही.(१७९)

१८०

गुरु पाहतां पाहतां लक्ष कोटी । बहूसाल मंत्रावळी शक्ति मोठी ।
मनीं कामना चेटकें धातमाता । जनीं वेर्थ रे तो नव्हे मुक्तिदाता ॥

तसे पाहिले तर जगामध्ये लक्षावधी नव्हे तर कोट्यावधी गुरु आहेत. त्यांच्याजवळ अनेक प्रकारचे मंत्र असतात व शक्ती असतात. परंतु ते वासनेने लिप्त असतात. पैसा, मान-मरातब, प्रसिद्धी या गोष्टी मिळविण्यासाठी ते अनेक खोट्या गोष्टी प्रचलित करतात, जादू-टोणा करतात. असा गुरु म्हणविणारा व्यर्थ होय. तो परमेश्वराचे दर्शन घडवून मुक्ती देणारा नव्हे.(१८०)

१८१

नव्हे चेटकी चाळकु द्रव्यभोंदु । नव्हे निंदकु मछरू भक्तिमंदु ।
नव्हे उन्मतु वेसनी संगबाधु । जगीं ज्ञानिया तो चि साधु अगाधु ॥

जो जादू-टोणा करीत नाही, जो लोकांना फसवीत नाही, जो फसवून पैसे उकळणारा नाही, जो निंदा-मत्सर करणारा नाही, जो भक्ती नसणारा नाही, जो उन्मत्त नाही, जो व्यसनी नाही, जो आपल्या संगतीने दुसऱ्यास बिघडवणारा नाही. तो खरा आत्मज्ञानी होय, तोच खरा साधू होय आणि तोच गुरु या पदास योग्य होय.(१८१)

१८२

वासना वाऊगी चाहुटी काम पोटीं । क्रियेवीण वाचाळता ते चि मोठी ।
मुखें बोलिल्यासारखें चालताहे । मना सद्‌गुरु तो चि शोधूनि पाहे ॥

ज्याच्या अंत:करणात वासना भरलेल्या आहेत, तो वायफळ बडबड करतो, अर्वाच्य बोलतो. जो आचरण न करता मोठ्या बढाया मारतो असा माणूस गुरुपदास योग्य नव्हे. जो बोलल्याप्रमाणे वागतो, आत्मज्ञानाप्रमाणे आचरण करतो, तोच खरा सद्‌गुरु होय. असाच सद्‌गुरु शोधावा.(१८२)

१८३

जनीं भक्त ज्ञानी विवेकी विरागी । कृपाळू मनैस्वी क्षमावंत योगी ।
प्रभु दक्ष वित्पन्न चातुर्य जाणे । तयाचेन योगें समाधान बाणे ॥

जो खरा भक्त आहे, जो खरा ज्ञानी आहे, जो विवेकी आहे आणि वैराग्यसंपन्न आहे, जो योगी आहे, जो अत्यंत क्षमाशील आहे, जो कृपाळू आहे, जो महान आहे, जो दक्ष असतो, जो विद्वान असतो, जो चतुर असतो आणि ज्याच्या सहवासाने समाधान मिळते तो सत्पुरुष गुरूपदाच्या योग्यतेचा असतो.(१८३)

१८४

**नव्हें ते चि जालें नसे तें चि आलें । कळों लागलें सज्जनाचेनि बोलें ।**
**अनिर्वाच्य तें वाच्य वाचे वदावे । मना संत आनंत शोधीत जावें ॥**

जे निर्गुण परब्रह्म होते त्याला मायेमुळे सगुणता प्राप्त झाली. जे अव्यक्त स्वरूपात होते ते सगुण-साकार झाले. संतांच्या सांगण्यामुळे या गोष्टी कळू लागल्या. खरे तर परब्रह्म हे सांगता येण्याच्या पलीकडचे आहे. म्हणून हे मना, संतांच्या उपदेशाप्रमाणे तू परमात्म्याचे स्वरूप शोधण्याचा प्रयत्न कर.(१८४)

१८५

**लपावें अती आदरें रामरूपीं । भयातीत निश्चीत ये सस्वरूपी ।**
**कदा तो जनीं पाहतां ही दिसेना । सदा ऐक्य तो भिन्न भावे वसेना ॥**

परमात्म्याचे स्वरुप जाणून घेऊन त्यामध्ये मोठ्या आदराने एकरूप होऊन जावे. ते आत्मरूप सर्व भयाच्या पलीकडचे आहे. ते बाहेर दिसत नाही. पण जेव्हा द्वैत उरत नाही, तेव्हा तेथे अद्वैताचे ऐक्य असते.(१८५)

१८६

**सदा सर्वदा राम सन्नीध आहे । मना सज्जना सत्य शोधून पाहें ।**
**अखंडीत भेटी रघूराज योगु । मना सांडि रे मीपणाचा वियोगु ॥**

हे मना, भगवान राम हा सदा सर्वदा आपल्याजवळच असतो. तू शोधून तर बघ. आत्मा आणि परमात्मा यांचे अखंड मीलन असते. अहंभावामुळे त्या दोघांचा वियोग होतो. म्हणून तो अहंभाव सोडून दे.(१८६)

१८७

**भुतें पिंड ब्रह्मांड हे ऐक्य आहे । परी सर्व ही सस्वरूपी न साहे ।**
**मना भासलें सर्व कांही पहावें । परी संग सोडूनि सूखी रहावें ॥**

पंचमहाभूते, पिंड (जीव) व ब्रह्मांड याच्यामध्ये ऐक्य आहे. परंतु शाश्वत अशा आत्मस्वरूपात त्यांना स्थान नाही. हे मना, जे अनुभवाला येते ते पाहात जावे

परंतु ते पाहताना साक्षीभाव ठेवावा व त्यात लिप्त होऊ नये. अशा प्रकारे स्वानंदामध्ये मग्न होऊन सुखी बनावे.(१८७)

१८८

**देहभान हे ज्ञानशस्त्रें खुडावें । विदेहीपणें भक्तिमार्गें चि जावें ।**
**विरक्तीबळें निंद्य सर्वै तजावें । परी संग सोडूनि सूखी रहावें ॥**

आत्मज्ञान करून घेऊन त्या शस्त्राने मी म्हणजे देह आहे ही जाणीव तोडून टाकावी. देहभान सोडून द्यावे आणि भक्तिमार्गाने जावे. अंगी विरक्ती बाणवून तिच्याद्वारे निंद्य असलेली देहबुद्धी, वासना इत्यादींचा त्याग करावा. विषयांचा संग सोडून द्यावा. म्हणजे स्वानंदाचे सुख प्राप्त होते.(१८८)

१८९

**मही निर्मिली देव तो वोळखावा । जया पाहतां मोक्ष तत्काळ जीवा ।**
**तया निर्गुणालागि गूणीं पहावें । परी संग सोडूनि सूखें रहावें ॥**

ज्याने पृथ्वी निर्माण केली त्या परमेश्वराचे ज्ञान करून घ्यावे.त्याचे ज्ञान होताच जीवाला तत्काळ मोक्ष मिळतो. निर्गुण परमेश्वर सगुण रूपात भरलेला आहे, याचा अनुभव घ्यावा. विषयांचा संग सोडून द्यावा, म्हणजे सुखाने राहता येते.(१८९)

१९०

**नव्हे कार्यकर्ता नव्हे सृष्टिभर्ता । परेहूनि पर्ता न लिंपे विवर्ता ।**
**तया निर्विकल्पासि कल्पीत जावें । परी संग सोडूनि सूखें राहावें ॥**

परमात्मा हा कार्य-कारण भावाच्या पलीकडचा आहे. तो सृष्टीचे पालन करतो, असे आपण म्हणतो, परंतु तशा कल्पनेहून तो वेगळा आहे. तो परावाणीच्याही पलीकडचा आहे. त्याचे वर्णन करणे अशक्य आहे. तो मायेने लिप्त होत नाही. तो सर्व कल्पनांच्या पलीकडचा आहे, तरीही प्रेमाने त्याच्या स्वरूपाची कल्पना करावी. विषयांचा संग सोडून द्यावा, आणि त्या परमात्म्याच्या सुखात मग्न राहावे. (१९०)

१९१

**देहेबुधिचा निश्चयो ज्या टळेना । तया ज्ञान कल्पांतकाळी कळेना ।**
**परब्रह्म तें मीपणें आकळेना । मनीं शून्य अज्ञान हें मावळेना ॥**

देह म्हणजेच मी हा झालेला निश्चय जोपर्यंत मनातून जात नाही, तो

पर्यंत ब्रह्मज्ञान होणे शक्य नाही. जोपर्यंत मीपणा नाहीसा होत नाही, तोपर्यंत परब्रह्माचे आकलन होणार नाही, तसेच जे मुळातच नाही व मायिक आहे ते अज्ञान लोप पावणार नाही.(१९१)

१९२

**मना ना कळे ना ढळे रूप ज्याचें। दुजेवीण तें ध्यान सर्वोत्तमाचें।**
**तया खूण ते हीण दृष्टान्त पाहे । तेथें संग निसंग दोनी न साहे ॥**

ज्याच्यामध्ये कधीही बदल होत नाही, अशा भगवंताचे स्वरूप मनाला कधी आकलन करता येत नाही. तो सर्वोत्तम आहे. त्याचे ध्यान अभिन्नपणे करावे. खुणेने त्याचे स्वरूप सांगायचा प्रयत्न करावा, तर दृष्टांत अपुरा पडतो. तो एकमेवाद्वितीय आहे. तेथे संग व नि:संग या गोष्टी उरत नाहीत.(१९२)

१९३

**नव्हे जाणता नेणता देवराणा । न ये वर्णिता वेदशास्त्रां पुराणां ।**
**नव्हे दृश्य अदृश्य साक्षी तयाचा । श्रुति नेणती नेणती अंत त्याचा ॥**

परमात्म्याच्या ठिकाणी ज्ञान नाही आणि अज्ञानही नाही. वेद, शास्त्रे, पुराणे इत्यादींना त्याचे वर्णन करता आलेले नाही. तो दिसणारा नाही किंवा न दिसणाराही नाही. दृश्य व अदृश्याचा तो साक्षीही नव्हे. वेदांना त्याचा थांग लागू शकला नाही.(१९३)

१९४

**वसे हृदयी देव तो कोण कैसा । पुसे आदरें सादकु प्रेष्ण ऐसा ।**
**देहे टाकितां देव कोठें राहातो । परी मागुता ठाव कोठें पहातो ॥**

साधक आदराने प्रश्न विचारतो की, माणसाच्या हृदयात जो देव आहे तो कोण आहे? तो कसा आहे? माणूस जेव्हा देहत्याग करतो, तेव्हा तो देव कोठे राहतो? आणि नंतर कोठे जन्म घेतो ?(१९४)

१९५

**वसे हृदयीं देव तो जाण ऐसा । नभाचे परी व्यापकु जाण तैसा ।**
**सदा संचला येत ना जात कांहीं । तयावीण कोठें रिता ठाव नाही ॥**

या प्रश्नाला उत्तर देताना श्रीसमर्थ असे उत्तर देतात की, हृदयामध्ये जो देव राहतो, तो नभाप्रमाणे सर्वत्र व्यापून असतो, असे समजावे. तो निरंतर सर्वत्र भरलेला आहे. तो येत नाही किंवा जातही नाही. तो सर्वत्र व्यापलेला असल्याने त्याच्याशिवाय मोकळी अशी जागाच नाही.(१९५)

१९६

**नभीं वावरे जो अणुरेणु कांहीं । रिता ठाव या राघवेंवीण नाहीं ।**
**तया पाहतां पाहतां तेंचि जालें । तेथें लक्ष आलक्ष सर्वें बुडालें ।।**

आकाशामध्ये जे अणू-रेणू वावरतात त्यांमध्येही परम-तत्त्व भरून राहिले आहे. परमेश्वरावाचून कोणतेही स्थान रिकामे नाही. त्या स्वरूपास पाहण्याचा अभ्यास करता-करता पाहणारा स्वत:च ते स्वरूप बनून जातो. त्या परमतत्त्वाचे ठायी सर्व दृश्य-अदृश्य लोप पावते व एकच ते तत्त्व उरते.(१९६)

१९७

**नभासारिखें रूप या राघवाचें । मनीं चिंतितां मूळ तूटे भवाचें ।**
**तया पाहतां देहबुधी उरेना । सदा सर्वदा आर्त पोटीं पुरेना ।।**

प्रभू श्रीरामाचे स्वरूप आकाशासारखे आहे. त्याचे चिंतन मनोभावे केल्यास जीवनातील दु:ख नाहीसे होते. त्या स्वरूपाचे दर्शन झाल्यावर देहबुद्धी उरत नाही. ते स्वरूप कितीही वेळा पाहिले तरी तृप्ती होत नाही.(१९७)

१९८

**नभें व्यापिलें सर्व सृष्टीस आहे । रघूनायेका उपमा ते न साहे ।**
**दुजेवीण जो तोचि तो हा स्वभावें । तया व्यापकु व्यर्थ कैसें म्हणावें ।।**

आकाशाने सर्व सृष्टी व्यापून टाकली आहे, हे खरे, परंतु परमात्मस्वरूपातस ती उपमा देता येत नाही. ते स्वरूप सर्वत्र भरून राहिले आहे. ते स्वभावत: एकच आहे. मग त्याला व्यापक कसे म्हणता येईल ?(१९८)

१९९

**अती जीर्ण विस्तीर्ण तें रूप आहे । तेथें तर्क संपर्क तोही न साहे ।**
**अती गूढ तें दृढ तत्काळ सोपें । दुजेवीण जें खूण स्वामीप्रतापें ।।**

परमात्म-स्वरूप हे अत्यंत पुरातन व इतके विशाल आहे की तेथे तर्क पोहोचूच शकत नाही. ते अत्यंत गूढ, गुप्त व स्थिर आहे. त्याच्या ठिकाणी द्वैत नाही. ही खूण सद्‌गुरूच्या कृपेने समजली की ते तत्काळ सोपे व सुलभ बनते.(१९९)

२००

**कळे आकळे रूप ज्ञान होतां । तेथें आटली सर्वसाक्षी अवस्था ।**
**मना उन्मनी शब्द कुंठीत राहे । तो ये तो चि तो राम सर्वत्र पाहे ।।**

गुरुकृपेने ज्ञान झाले म्हणजे ते परमात्म-स्वरूप कळते व त्याचे आकलन

होते. तेथे सर्वसाक्षी अवस्थाही विलीन होऊन जाते. मन उन्मन होऊन जाते आणि शब्द कुंठित होऊन जातात. मग एका परमात्म्याखेरीज सर्वत्र काहीच दिसत नाही.(२००)

२०१

**कदा वोळखीमाजी दूजें दिसेना । मनीं मानसीं द्वैत कांही बसेना ।**
**बहूतां दिसां आपुली भेटि जाली । विदेहीपणें सर्व काया निवाली ॥**

एकदा का परमात्म्याचा अनुभव आला की दुसरे काही दिसत नाही. मनामध्ये चुकूनही द्वैतभाव येत नाही. बऱ्याच काळानंतर (जन्मानंतर) आपले जे मूळ स्वरूप त्या परमात्म-तत्त्वाशी भेट झाली की देहभान विसरून जाते, दुःखे नाहीशी होतात आणि जीवाला शांतता लाभते.(२०१)

२०२

**मना गूज रें तूज हें प्राप्त जालें । परी अंतरी पाहिजे येत्न केलें ।**
**सदा श्रवणें पाविजे निश्चयासी । धरी सज्ञनसंगती धन्य होती ॥**

हे मना, परमात्म्याचे जे रहस्य आहे ते तुला मिळाले आहे. पण त्याचा अनुभव येण्यास तुला अंतर्यामी साधन केले पाहिजे. संतांचा उपदेश सतत श्रवण केल्यामुळे तुला आत्मज्ञान निश्चित मिळेल, म्हणून जे संतांची संगती धरतात ते धन्य होय.(२०२)

२०३

**मना सर्वही संग सोडूनि द्यावा । अती आदरें सज्जनाचा धरावा ।**
**जयाचेनि संगें महां दुःख भंगे । जनीं साधनेंवीण सन्मार्ग लागे ॥**

हे मना, जगामध्ये इतर सर्वांची संगत सोडावी व संतांची संगत धरावी. त्यांच्या संगतीमुळे मोठ-मोठाली दुःखे नाहीशी होतात आणि साधनाचे कष्ट न करताही सन्मार्ग सापडतो.(२०३)

२०४

**मना संग हा सर्व संगास तोडी । मना संग हा मोक्ष तत्काळ जोडी ।**
**मना संग हा साधकां सीघ्र सोडी । मना संग हा द्वैत निशेष मोडी ॥**

हे मना, संतांची संगत ही इतर संगतीपासून आपणास बाजूला करते आणि ती तत्काळ मुक्तीचा लाभ करून देते. साधकाला सत्संग त्वरित मुक्त करतो. सत्संगामुळे द्वैतभाव पूर्णतः नाहीसा होतो.(२०४)

२०५

**मनाची शतें ऐकतां दोष जाती । मतीमंद ते साधना योग्य होती ।**
**चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य आंगी । म्हणे दास विश्वासतां मुक्ति भोगी ॥**

हे मनाचे श्लोक श्रवण केल्यामुळे सर्व दोष निघून जातील. जे अज्ञानी आहेत त्यांना साधन करण्याची योग्यता लाभेल. त्यांच्या अंगी ज्ञान-वैराग्य व सामर्थ्य येईल. श्रीसमर्थ रामदास म्हणतात की त्या लोकांना खात्रीने मुक्तीचा लाभ होईल.(२०५)

* * *